दातांच्या कोणत्याही तक्रारीसाठी एकवेळ अवश्य भेट द्या.
कदम डेंटल क्लिनिक
* रूट कॅनल ट्रीटमेंट
* दातांमध्ये सिमेंट भरणे
* फिक्स दात बसवणे
* हिरड्यांची शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करणे
* दातांची कवळी तयार करणे
९३५६६९५८६४
सावरकरनगर, बस स्टँडच्या पूर्वेला, खानापूर रोड, विटा.

''सेवा ! वाचकाय, समाजहित रक्षणाय अस्तु ।''

# साप्ताहिक विशाल विटा

संपादक : राजेंद्र शहाजी निकम

बिस्मिल्लाह यासीन पलवरायझर्स
खजाना कचरावाला
आम्ही सर्व प्रकारचा कचरा खरदी करतो
सर्व भारतभर सेवा उपलब्ध
एक वेळ अवश्य संपर्क साधा...
८१२५५४१०९८ / ९४४०७४०६२३
९८४९९८५३८९ / ९०३०५७६३६४
दाजीपट्टी-५२२ ४१४, जि. गुंटूर (आंध्र.)

वर्ष ३६ वे | अंक ८ वा | Postal Registration No.SGL/08/2024-26 | Posted at Vite SO 415311 | पृष्ठे १६ | किंमत ५ रुपये | १५ डिसेंबर २०२५

## महिला स्वयंसाहाय्यता गटांसाठी कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करुन देणार

**नागपूर** : राज्यातील महिला स्वयंसाहाय्यता गटांना कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी 'उमेद मॉल' या महत्त्वकांक्षी संकल्पनेला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. पहिल्या टप्प्यात राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल' उभारण्याचे लक्ष्य असून, त्यासाठी सरकारने २०० कोटींची तरतूद केल्याची माहिती ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी शुक्रवार दि.१२ डिसेंबर रोजी विधानसभेत दिली. विधानसभा सदस्य राणाजगजितसिंह पाटील, सुनील प्रभू, योगेश सागर, संजय कुटे, नारायण कुचे, सुधीर मुनगंटीवार, सत्यजित देशमुख, मुरजी पटेल, समीर मेघे यांनी प्रश्नोत्तराच्या तासात उमेद मॉल संदर्भात प्रश्न विचारले होते. त्याला उत्तर देताना मंत्री गोरे म्हणाले, सर्वच महिला स्वयंसाहाय्यता गटांना मोठा आधार देण्यात येत आहे. राज्यात ६,५३,१९२ बचत गट कार्यरत असून, त्यांना आतापर्यंत ८७२ कोटींचा फिरता निधी वितरित केला आहे. तसेच, ३,७०,३५० गटांना २२२ कोटींचा समुदाय निधी देण्यात आला आहे. बँकांकडूनही मोठ्या प्रमाणात अर्थसाहाय्य मिळत असल्याने महिलांच्यात उपजीविकेसाठी लघुउद्योजकता मोठ्या प्रमाणात वाढली असल्याचे त्यांनी नमूद केले. ग्रामीण भागातील महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळावी म्हणून 'महालक्ष्मी सरस, जिल्हा आणि मिनी सरस अशाप्रदर्शनांचे आयोजन राज्यभर करण्यात येते. मात्र, ही केंद्रे तात्पुरती असल्याने महिलांसाठी १२ महिने उपलब्ध असलेली कायमची बाजारपेठ तयार करण्याचा निर्णय म्हणजे 'उमेद मॉल' (जिल्हा विक्री केंद्र) असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान २० हजार चौरस फुटांचे मॉल

(पान नं. ३ वर)

### उठाठेव — बेलेकर



लई फटाके फुटलेत वो... निवडणूकीचे नाय वो... ... उभा नाय राहिलो म्हणून आमच्या घरात फुटलेत !

## गुणवत्तेच्या बेदाण्यात भारत पिछाडीवर;सरकारच्या दुर्लक्षाचा परिणाम

सांगली : जगभरात बेदाण्याला मागणी वाढत आहे. भारतासाठी विशेषतः महाराष्ट्रातील सांगली, नाशिक, सोलापूर या जिल्ह्यांसाठी ही मोठी संधी आहे. मात्र निर्यातक्षम व गुणवत्तापूर्ण बेदाणा उत्पादनाचा अभाव असल्यामुळे बेदाणा उद्योग क्षेत्रात भारत इतर देशांच्या तुलनेत पाठीमागे पडत आहे. दक्षिण आफ्रिकेसारख्या देशातून सुद्धा बेदाण्याची युरोपसह अनेक देशात निर्यात वाढत आहे. परकीय चलन मिळवून देणाऱ्या या उद्योगक्षेत्राकडे सरकारने दुर्लक्ष केल्यामुळे ही स्थिती झाल्याचा आरोप शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे. दरम्यान, हे चित्र बदलण्यासाठी व द्राक्षे, बेदाणा क्षेत्राच्या विकासासाठी राज्य द्राक्ष बागायतदार संघ पुढाकार घेणार आहे. बदलत्या जीवनशैलीमध्ये ड्रायफ्रूटला मागणी वाढत आहे. त्यामध्ये विशेषतः बेदाण्याचा समावेश मोठ्या प्रमाणात आहे. देशात बेदाण्याचे सर्वाधिक उत्पादन महाराष्ट्रात विशेषतः सांगली, सोलापूर, नाशिक जिल्ह्यांत होते. यातून हजारो लोकांना रोजगार मिळाला आहे. परकीय चलन मोठ्या प्रमाणात मिळते. मात्र काळानुरूप या उद्योगात अपेक्षित बदल होत नाहीत. दक्षिण आफ्रिकेमध्ये नुकतीच जागतिक बेदाणा परिषद झाली. या परिषदेला राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे शिष्टमंडळ उपस्थित होते. या परिषदेमध्ये जगाच्या तुलनेत भारत द्राक्ष आणि बेदाणा याबाबतीत कुठे आहे हे लक्षात आले. दक्षिण आफ्रिका हा मागास देश मानला जातो. मात्र या शिष्टमंडळाला त्या ठिकाणी द्राक्षाची आधुनिक पद्धतीची होणारी सेंद्रिय शेती आढळून आली. त्यामुळे त्या ठिकाणचा बेदाणा हा युरोपीय देशात मोठ्या प्रमाणात निर्यात होत आहे. तसेच सरकारचे पाठबळ असल्यामुळे द्राक्ष शेतीत

(पान नं. ३ वर)

# गल्लीपासून दिल्लीपर्यंतच्या सर्वच निवडणुकीतील नैतिकतेचा प्रश्न

## संपादकीय

**भा**रतामध्ये भाजपने सर्व निवडणुका कोणत्याही परिस्थितीत जिंकण्याचाच निश्चय केल्याचे दिसतोय. देशाच्या दक्षिण राज्यांत भाजप नव्हता, तिथे आता काही लोक भाजपने तयार केले गेले आहेत. काही ठिकाणी स्थानिक पक्षांशी युती करत भाजपने आपले सत्तेतील स्थान बळकट केले आहे. महाराष्ट्रात विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपला काय हवे ते देण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे. प्रसंगी नवीन स्थापन झालेल्या पक्षाशी युती करत, त्यांना सत्तेतील महत्वाचे एखादे पद देत भाजपने सत्ता अबाधित राखली आहे. पुढे यथावकाश भाजपने राज्यात आपला प्रभाव वाढवत पूर्ण सत्ता स्थापन करण्याचे प्रयत्न सुरुच ठेवले आहेत. राज्यात भाजपचे १३२ आमदार आहेत. या पाठीमागे फडणवीस यांची मेहनत किंवा तंत्रज्ञानाची कमाल जास्त असावी असेच वाटते. गेल्या लोकसभा निवडणुकीत राज्यात भाजपच्या हाती काही लागले नव्हते. २८ जागा लढवून त्यांना केवळ १० खासदार निवडून आणता आले होते. नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका, नगरपंचायतीच्या निवडणुका आणि मागील काही निवडणुकांचे परीक्षण केले तर काही गोष्टी सर्वसामान्यांना खटकत आहेत. राज्यातील निवडणुकांची नितीमत्ता पूर्णपणे ढासळलेली आहे, नैतिकता औषधालाही उरलेली नाही की काय, असा प्रश्न पडल्यावाचून राहत नाही.

२०१४ साली भारतीय जनता पक्षाला महाराष्ट्रातील जनतेने विधानसभेत क्रमांक एकचा पक्ष बनवले ; तेव्हा असे वाटले होते की, मोदी लाटेत विरोधकांचा धुव्वा उडाला. त्यानंतर झालेल्या बऱ्याच निवडणुकांत भाजपने यशाचा मार्ग स्वीकारला, तो खचितच योग्य वाटत नव्हता. त्यानंतर हेही जाणवू लागले की, खूप मोठ्या फरकाने भाजपला लोक खरंच पसंत करतात? त्यावर विरोधकांनी तक्रार केली की, ईव्हीएम मशीनमध्ये काहीतरी गडबड आहे. म्हणून मतदान मतपत्रिकेव्दारे घ्या, अशी मागणी विरोधकांनी केली. ईव्हीएममध्ये तांत्रिक साधनांच्या सहाय्याने बदल होऊ शकतो, हे वारंवार सिद्ध झाले आहे. मात्र विद्यमान केंद्र सरकारने पारंपरिक मतदानास जास्त खर्च येतो, असे सांगून विरोधकांचा तो पर्याय बंद केला. खरे तर अनेक पुढारलेल्या देशांत पारंपारिक पद्धतीने मतदान केले जाते, परंतु भारतात डिजिटलच्या नावाने मतदारांना पारंपारिक मतदानापासून वंचित ठेवले जाते, हे योग्य नाही. भाजपला आता फारसा विरोध करणारी मंडळी राहिलेली नाहीत. भाजपात गेल्यावर राष्ट्रीय तपास यंत्रणांची चौकशी होत नाही, तुरुंगात जाण्याचा प्रश्नच येत नाही, अशी मानसिकता सर्वांची बनली आहे. भाजपमधील मूळ निष्ठावंत कार्यकर्ते मात्र वर्षोनुवर्षे सतरंज्या उचलणे, सभेची तयारी करणे, प्रचार करण्यात मग्न असल्याचे दिसतात. नुकत्याच झालेल्या नगरपालिका, नगरपंचायतीच्या निवडणुकीत असे दिसून आले की, मतदारांना जेवणावळी, रोख रक्कम देण्याचे प्रकार वाढले आहेत.

सांगली जिल्ह्यातील आष्टा येथील एकनाथ शिंदे शिवसेनेच्या नगरसेवकपदाच्या वीर कुदळे या उमेदवाराने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली आहे की, आता यापुढे महाराष्ट्रात लिलावाद्वारे महापौर, नगरसेवक, नगराध्यक्ष पदे भरा. नगरपालिका, नगरपंचायती यांच्यासाठी निवडणूक लढवताना अनेक पक्षांनी पैशाचे मोठ्या प्रमाणात वाटप केले, काही ठिकाणी जेवणाची कुपन्स वाटली. त्यामुळे राज्य सरकारने नगराध्यक्षपद, नगरसेवक पदांचा जाहीर लिलाव करावा. लिलाव करून महापौर, नगरसेवक, नगराध्यक्ष पदे भरा. त्यामुळे राज्य सरकारच्या तिजोरीत खूप फंड येईल, आणि अशा प्रकारचे विधेयक सध्या सुरू असलेल्या राज्याच्या हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्र्यांनी मांडावे. दोन्ही सभागृहात राज्य सरकारचे बहुमत असल्याने हे विधेयक मंजूर होईल, अशी मागणी आष्टा नगरपालिकेतील वीर कुदळे यांनी केली आहे. कुदळे यांच्या अजब मागणीमुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे. यात कुदळे यांचे काय चुकले ? जे वास्तव आहे, ते त्यांनी समोर आणले. सर्वसामान्य, प्रामाणिक उमेदवाराला हे सर्व शक्य नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पदांचा लिलाव सरकारने मोठ्या किंमतीत करावा आणि त्यात काळेधंदेवाले, गुन्हेगार, मटकेवाले आणि धनदांडगे यांना घ्यावे. म्हणजे सरकारला या प्रक्रियेत खूप पैसा मिळेल. कुदळे यांचे म्हणणे अवास्तव वाटत असले तरी निवडणुकीत मतदारांना पैसे वाटप करण्यापेक्षा पदांचा लिलाव करणे बरे होईल.

राज्य सरकारला अतिवृष्टीग्रस्त शेतकर्यांना मदत देण्यासाठी पैसे नाहीत, तर निवडणूक लढवणाऱ्या बड्या पक्षांच्या कार्यकर्त्यांकडे अतिरिक्त पैसे आले कुठून ? निवडणूक आयोगाला झालेल्या प्रकाराची खबर नसावी, हे विशेष आहे. नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीत अनेक नेत्यांनी जेवणावळी, पैशाचे वाटप केले अशी चर्चा आहे. ही अचानक राज्यात कार्यकर्ते, नेत्यांची प्रगती कशी काय दिसून आली, हे कोडेच आहे. सर्वसामान्य नागरिकाला काम केल्याशिवाय पैसा मिळत नाही, मिळाला तर तुटपुंजा पैसा मिळतो. विनाकष्ट पैसा येतो कुठून, हा प्रश्न आता जनतेच्या मनात निर्माण होत आहे. राजकारण तर पैशाचा व्यवसाय नाही. पूर्वीचे काही नेते शेकापचे गणपतराव देशमुख एस. टी. ने प्रवास करायचे. आता नेते एखाद्या पक्षात जाण्यासाठी पैसे घेतात असा आरोप होत आहे. कटू असले तरी हेच वास्तव आहे. महात्मा गांधी, लालबहाददूर शास्त्री या नेत्यांच्या देशात मतदार मते देण्यासाठी पैशाची मागणी करतो आणि नेते मतदारांना पैशाची लालूच दाखवतात , हे विचित्र वाटते. मतदारांना आणि देशातील विविध पक्षाच्या नेत्यांना दुबळे कोणी केले ? या प्रश्नाची उत्तरे ज्याची त्याने शोधावीत. लोकशाहीत ही विकृती कशी आली ? आणि कोणी आणली ? याची उत्तरे शोधणे आणि समाजात बदल करणे महत्वाचे वाटते.

## महिला स्वयंसाहाय्यता गटांसाठी कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करुन देणार

(पान नं. १ वरुन)

उभारण्याचा सरकारचा विचार आहे. त्यासाठी संबंधित जिल्हा परिषदांकडून योग्य जागांची निवड सुरू आहे. मुख्य म्हणजे, मार्च २०२६ मध्ये मुदत संपत असली, तरी कोणत्याही स्थितीत उमेद प्रकल्प बंद होणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. बिहारमध्ये उमेद कंत्राटी कर्मचाऱ्यांना कोणती मदत करण्यात आली, याची माहिती एका महिन्यात मागवली आहे. तसेच, अधिवेशन संपल्यानंतर १५ दिवसांच्या आत संबंधित संघटनांसोबत बैठक घेऊन कायमस्वरूपी तोडगा काढण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन त्यांनी दिले.

## ढगाळ हवामानामुळे फळ पिकांचे उत्पादन घटण्याची शक्यता

**कोल्हापूर** : ढगाळ हवामानामुळे विविध रोगांचा प्रादुर्भाव झाल्यामुळे राज्यातील फळबागांना वाढता धोका निर्माण झाला आहे. परिणामी यंदा राज्यातील द्राक्ष, आंबा, काजू, डाळींब, संत्री यासह सर्वच फळ पिकांचे उत्पादन घटण्याची चिन्हे दिसत आहेत. नाशिक, सांगली, सोलापूर, सातारा, पुणे आणि अहिल्यानगर हे जिल्हे प्रामुख्याने द्राक्ष उत्पादक म्हणून ओळखले जातात. राज्यात द्राक्ष पिकाखाली तीन ते साडेतीन लाख एकर शेती आहे. ऑक्टोबर छाटणीनंतर बहुतांश बागांमध्ये द्राक्षे बहरत असतानाच ढगाळ हवामानामुळे द्राक्षांवर भुरी आणि डाऊनी रोगाचा प्रादुर्भाव होताना दिसत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कीटकनाशकांच्या फवारणीवर भर दिलेला आहे. या रोगांचा प्रादुर्भाव लवकर आटोक्यात आला नाही तर द्राक्षशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान संभवते. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, कोल्हापूर, सांगली, सातारा हे जिल्हे प्रामुख्याने आंबा उत्पादक आहेत. राज्याच्या अन्य भागातही मोठ्या प्रमाणात आंब्याची लागवड आढळून येते. राज्यात जवळपास चार लाख एकर क्षेत्र आंबा पिकाखाली आहे. ढगाळ हवामानामुळे आंब्यावर करपा आणि भुरीचा प्रादुर्भाव होताना दिसत आहे. परिणामी नवीन पालवी आणि मोहोर गळताना दिसत आहे. त्यामुळे फळांना खात्रीचा हमीभाव मिळत नाही. प्रामुख्याने सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, कोल्हापूर या जिल्ह्यांत काजू पिकाखाली जवळपास तीन लाख एकर क्षेत्र आहे. मात्र ढगाळ हवामानामुळे काजूला मावा आणि भुरीने ग्रासलेले दिसत आहे. परिणामी काजू आणि काजूगर वाढीवर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. राज्यात डाळींब पिकाखाली जवळपास अडीच लाख एकर क्षेत्र आहे. सोलापूर, सांगली, सातारा, अहिल्यानगर, नाशिक, जळगाव या जिल्ह्यांमध्ये प्रामुख्याने डाळिंबाची लागवड झालेली आहे. मात्र सध्या डाळींब बागांना तेल्या रोगाने ग्रासलेले दिसत आहे. डाळिंबाबर तेलकट डाग पडून फळांची गुणवत्ता कमी होते. राज्यात संत्री, पेरू, चिकू, आंबा, सीताफळ, लिंबू, चिंच, अंजीर, आवळा, कोकम, जांभूळ आदी फळ पिकेही मोठ्या प्रमाणात घेतली जातात. राज्यातील एकूण फळ पिकाखालील क्षेत्र हे साधारणतः ३० लाख एकर आहे. ढगाळ हवामानामुळे राज्यातील सर्वच फळ पिकांना धोका निर्माण झाला असून त्यांच्या सरासरी उत्पादनात किमान १० ते २० टक्के घट होण्याची भीती व्यक्त होत आहे.

## गुणवत्तेच्या बेदाण्यात भारत पिछाडीवर; सरकारच्या दुर्लक्षाचा परिणाम

(पान नं. १ वरुन)

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. तेथील हवामानाला अनुकूल द्राक्षाचे वाण विकसित करण्यात आले आहेत. दर एकरी उत्पादन त्याठिकाणी जास्त आहे. याउलट महाराष्ट्रात स्थिती आहे. द्राक्षासाठी बदलत्या हवामानामुळे प्रतिकूल स्थिती वाढत आहे. पिकासाठी औषध फवारण्या सातत्याने कराव्या लागत आहेत. मोरोक्को, रोमानिया, रशिया, सौदी अरब, व्हिएतनाम, श्रीलंका, इंडोनेशिया या देशांत सर्वाधिक बेदाणा निर्यात होतो. परकीय चलन मिळवून देणाऱ्या या उद्योगाकडे सरकारचे दुर्लक्ष आहे. जागतिक स्तरावर भारत बेदाणा उत्पादनात पहिल्या पाच देशांमध्ये असला तरी, निर्यातीच्या बाबतीत मात्र तो बराच मागे आहे. याउलट, दक्षिण आफ्रिकेचे स्थान आहे. दक्षिण आफ्रिकेतील बेदाणा उत्पादनापैकी ९० टक्केहून अधिक उत्पादन आंतरराष्ट्रीय बाजारपेठेसाठी निश्चित केले जाते. हवामान बदल, भौगोलिक धोक्यांमुळे आंतरराष्ट्रीय ग्राहक पुरवठादारांमध्ये विविधता शोधत आहेत. दक्षिण आफ्रिकेने उत्कृष्ट गुणवत्ता, अन्न सुरक्षा आणि सर्वोत्तम उत्पादन पद्धतींवर लक्ष केंद्रित करून या संधीचा फायदा घेतला आहे. भारत दरवर्षी सुमारे ५५,००० ते ६५,००० टन बेदाणा उत्पादन करतो आणि जागतिक उत्पादनात पाचव्या स्थानावर आहे. महाराष्ट्राचा वाटा यात सर्वाधिक म्हणजे सुमारे ७५ टक्के आहे. उत्पादनात आघाडीवर असूनही, जागतिक निर्यातीत भारताचा वाटा केवळ ३ टक्क्यांपर्यंत आहे. भारतीय बेदाण्याला देशांतर्गत बाजारपेठेत मागणी आहे. त्यामुळे निर्यातदार आंतरराष्ट्रीय बाजारात फारसे उत्सुक नसतात. सरकारकडूनही या उद्योगाला वाढण्यासाठी फारशी चालना मिळत नाही.

## चौथीही मुलगी झाल्याने आईनेच दाबला गळा

**बेळगाव** : चौथीही मुलगीच झाल्याने मातेनेच दोन दिवसाच्या बाळाचा गळा दाबून खून केल्याची हृदयद्रावक घटना रामदूर्ग तालुक्यात उघडकीस आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी सदर महिलेविरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. अश्विनी हणमंत हळकट्टी (वय ३०) ही महिला चौथ्यांदा गर्भवती होती. यासाठी ती काही दिवसांपूर्वी हिरेमंगलगी येथे माहेरी आली होती. दिवस पूर्ण झाल्याने ती बाळंतपणासाठी मुदकवी येथील प्राथमिक आरोग्य प्रसूतीसाठी केंद्रात दाखल झाली होती. तिने तिथे एका गोंडस बाळाला नैसर्गिकरित्या जन्म दिला. सदर महिलेला पहिल्या तीन मुली आहेत. चौथ्यांदा मुलगा होईल, अशी तिची अपेक्षा होती. परंतु, मुलगीच झाल्याने ती नाराज होती. दोन दिवस हॉस्पीटलमध्ये राहून २३ नोव्हेंबर रोजी ती माहेरी गेली. पण तिच्या मनात काही वेगळेच शिजत होते. मुलगी असल्याचे शल्य तिला होते. घरी कोणीच नसल्याचे पाहून तिने या दोन दिवसाच्या चिमुकल्याच्या गळ्यावर जोराने अंगठा दाबला. यामध्ये या मुलीचा श्वास कोंडून मृत्यू झाला. स्वतःच गळा दाबल्यानंतरही आपले बाळ निपचित पडले आहे, असे सांगत तिने रडायला सुरवात केली. बाळाच्या आजीने नातीला तातडीने रामदुर्ग येथील सरकारी रूग्णालयात नेले. डॉक्टरांनी तपासणी केली असता गळा दाबल्याने श्वास कोंडून मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले.

# भोंदू चुटकीबाबाला पोलिसांनी घेतले ताब्यात



**कोल्हापूर** : चुटकीबाबा सतत चकवा देत होता. मात्र, तीन दिवसांपूर्वी साताऱ्यातून बुक केलेल्या कॅबमुळे त्याचा ठावठिकाणा पोलिसांना मिळाला आणि रविवार दि.७ डिसेंबर रोजी पहाटे अटक टाळण्यासाठी ओळख लपवून पळणारा भोंदूबाबा सनी रमेश भोसले (रा. टिंबर मार्केट) ऊर्फ चुटकीबाबा सनी भोसले अखेर पोलिसांच्या जाळ्यात अडकला. सर्व मोबाईल बंद, बनावट नाव आणि वेशांतर करून तो पोलिसांना चकवा देत होता. मोबाईल फोन बंद ठेवल्याने पोलिसांना त्याचे लोकेशन मिळत नव्हते. मात्र, कॅबसाठी क्षणभर सुरू केलेल्या मोबाईलमुळे त्याचा खेळ खलास झाला. करणी काढून देतो, लग्न जमवून देतो, अंगातील भूत काढतो, तसेच अपत्यप्राप्ती करून देतो, अशा बहाण्याने भूलभुलैय्या करून अनेक महिलांना फसवणारा सनी भोसले ऊर्फ 'चुटकीबाबा' याची रिंगरोड परिसरातील विशालनगर येथे करवीर पोलिसांनी मंगळवारी दुपारी वरात काढली. दोन वर्षांपासून 'चुटकीबाबा'चे विशालनगर परिसरात भोंदूगिरीचे दुकान चालू होते. मी ब्रह्मांडाचा नायक आहे, असे म्हणत त्याने अनेक महिलांना लाखो रुपयांचा गंडा घातला आहे. करवीर पोलिसांनी त्याला अटक केल्यानंतर त्याचे अनेक कारनामे उघड होत आहेत. आपल्या भोंदूगिरीची आपण राहत असलेल्या परिसरात चर्चा होऊ नये, यासाठी ‘श्री कालभैरवाचे मंत्र’ लाऊड स्पीकरवर मोठ्या आवाजात लावून तो नागरिकांची दिशाभूल करीत होता. महाशिवरात्री दिवशी त्याने महादेवाची पूजा करून महाप्रसादाचे वाटपदेखील केले होते. सध्या ‘चुटकीबाबा’ ज्या घरात राहत होता त्या घरात पूर्वी अनेक तृतीयपंथी राहत होते. त्यामुळे नागरिक त्या घराकडे दुर्लक्ष करत होते. त्याचाच फायदा कथित 'चुटकीबाबा'ने घेऊन अनेकांना आर्थिक गंडा घातला आहे.

# ट्रॅक्टरद्वारे केली जाणारी रात्रीची ऊस वाहतूक ठरतेय धोकादायक



**तासगाव** : तालुक्यातील विसापूर भागात होणारी ऊस वाहतूक ही ट्रॅक्टरद्वारे जास्त प्रमाणात केली जात आहे. मात्र रात्रीच्यावेळी या भागात होणारी ऊस वाहतूक धोकादायक ठरत असून यातून अपघातांना आमंत्रण मिळत आहे. यातील बहुतांशी वाहनांना पाठीमागे रिफ्लेक्टर नसल्याने अपघात वाढत आहेत. गळीत हंगामात विसापूर, निंबळक, चिखलगोठण, बोरगाव, शिरगाव, आळते, लिंब तसेच विटा- तासगाव रोडवरील ऊस वाहतूक अपघात टाळण्यासाठी ऊस वाहतूक करणारे ट्रक, ट्रॅक्टर-ट्रेलर चालकांनी काही मूलभूत सुरक्षितता नियम पाळणे अत्यंत गरजेचे आहे. उसाची वाहतूक करणारी वाहने आकाराने मोठी असल्यामुळे रस्त्यावरून जाताना किंवा थांबलेली असताना इतर वाहनांना त्यांचा योग्य अंदाज येणे कठीण जाते. विशेषतः रात्री धूर, धुके किंवा कमी प्रकाशामुळे दृष्टिमानता कमी होते आणि मागून धडक बसून गंभीर अपघात होतात. रिफ्लेक्टर, टेप व इतर नियम म्हणून, ट्रक व ट्रॅक्टर-ट्रेलरना पुढील व मागील बाजूस स्पष्ट दिसेल अशा ठिकाणी रिफ्लेक्टर / रेडियम टेप लावणे अत्यावश्यक आहे. परंतु बहुतेक वाहने ही नियमबाह्य चालवताना दिसत आहेत. ऊस वाहतूक वाहन धारकांनी रात्री किंवा पहाटेच्या वेळी शक्यतो नियमित हेडलाईट, टेललाईट चालू ठेवणे, रिफ्लेक्टर स्वच्छ व व्यवस्थित आहेत का हे दररोज तपासणे, रस्त्याच्या कडेला वाहन उभे करावे लागल्यास शक्य तितक्या रस्त्याबाहेर घेणे हे गरजेचे आहे. तसेच पार्किंग लाईट, इंडिकेटर लावावेत आणि अनावश्यक हॉर्न साऊंड सिस्टीम टाळावी, कारण इतर वाहनांचे हॉर्न ऐकू येत नाहीत.

# जेजुरी गडावर खंडोबा देवाच्या चंपाषष्ठी उत्सवाची सांगता

**जेजुरी** : वांग्याचे भरीत, बाजरीचा रोडगा, कांद्याची पात, पुरणपोळीचा नैवेद्य खंडोबाला दाखवून झाली. तब्बल दोन हजार किलो वांग्याचे भरीत अन् भाकरीचा नैवेद्य यावेळी करण्यात आला होता. तसेच ५० हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. खंडोबा देवाच्या जेजुरी गडावर मार्गशीर्ष प्रतिपदेला चंपाषष्ठी उत्सवानिमित्त खंडोबा व म्हाळसा देवीच्या उत्सवमूर्तीची घटस्थापना करवीरपीठाचे शंकराचार्य श्री नृसिंह भारती यांच्या हस्ते करण्यात आली होती. पाच दिवस पूजा-अभिषेक, विविध धार्मिक तसेच सांस्कृतिक हळद अशा धार्मिक विधींनी सहा दिवस वातावरण मल्हारमय झाले होते. सहा दिवसांच्या उत्सवात खंडोबा मंदिर व जेजुरी गडाला आकर्षक रोषणाई करण्यात आली होती.

# राजलक्ष्मी एंटरप्राइजेस



गोल्ड रिफायनरी सिस्टम



सिल्व्हर रिफायनरी सिस्टम



मेल्टिंग सिस्टम



हूड सिस्टम



प्रेस मशीन



मॅन्युअल सिस्टम



व्हेसल (कुकर सिस्टम)


**मॅनेजिंग डायरेक्टर : समाधान डांगे**

अमीना मंझिल, अण्णा दाजी कॉम्प्लेक्स शेजारी, खानापूर रोड, **विटा**- ४१५३११, जि. सांगली ( महाराष्ट्र )

9545679693, 7020191418


## ❋ आमची उत्पादने ❋


- सर्व प्रकारच्या गोल्ड रिफायनरी मशिन.
- सर्व प्रकारच्या सिल्व्हर रिफायनरी मशिन.
- हॉलमार्कींग टेस्टिंग लॅबोरेटरी सेटअप आणि फुल हॉलमार्किंग सेटअप
- नायट्रिक ॲसिड रिफायनरीसाठी टायटॅनियम व्हेसल (भांडे) आणि कुकर सिस्टम.
- पी.पी. स्क्रबर (ॲसिडयुक्त धूर शुद्धीकरण)
- सर्व प्रकारचे केमिकल साठविण्यासाठी टॅंक
- सर्व प्रकारचे धातू गाळण्याकरीता मशिन (डिझेल भट्टी, गॅस भट्टी, इलेक्ट्रिक भट्टी, इंडक्शन भट्टी).

# सामूहिक गट शेतीत 'एआय' चा होणार वापर



**सांगली** : जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाने जिल्ह्यात सामूहिक गट शेतीचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यासाठी पुढाकार घेतला आहे. या प्रकल्पात अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. किमान १० ते कमाल २५ एकर क्षेत्र एकत्र करून या समूह शेती प्रकल्पांची उभारणी करण्यात येणार आहे. 'एआय' च्या वापरामुळे उत्पादनात किमान ३० टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची आशा आहे. 'एआय'च्या वापरामुळे शेतीसंबंधित विविध डाटा, पिकांची वाढ, हवामानातील बदल, मातीची स्थिती, पोषणद्रव्यांची पातळी यांचे संकलन व विश्लेषण अचूक आणि वेळेत होण्यास मदत होईल. त्यामुळे पिकांना योग्य प्रमाणात पाणी, खते देता येतील. तसेच उत्पादन व गुणवत्तेत सुधारणा होईल. हवामान, मातीतील ओलावा व जल उपलब्धता लक्षात घेऊन स्मार्ट सिंचनाचे नियोजन करता येणार असल्याने पाण्याची बचत होण्यास मदत होईल. जिल्ह्यात ऊस, द्राक्ष या प्रमुख नगदी पिकांसह तूर, हरभरा, मका पिकांवर कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून प्रयोग करण्यात येणार आहे. यासाठी बारामती येथील कृषी विज्ञान केंद्राचा तांत्रिक सहयोग घेण्यात आला आहे. प्रायोगिक तत्त्वावर तासगाव, कवठेमहांकाळ तालुक्यांतील द्राक्षबागा, तर मिरज आणि वाळवा तालुक्यांतील ऊसशेती समूह प्रकल्पासाठी निवडण्यात आले आहेत. समूह शेती प्रकल्पासाठी १० ते २५ एकर शेती क्षेत्र दीड किलोमीटर परिघात असणे आवश्यक आहे. पात्र क्षेत्रासाठी शेतकऱ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. अर्जांच्या छाननीनंतर संबंधित गटाची नोंदणी करून त्या ठिकाणी 'एआय आधारित समूह शेती प्रकल्प उभारण्यात येणार आहे.

# टोल वसूलीसाठी नवी इलेक्ट्रॉनिक प्रणाली लागू होणार



**नवी दिल्ली** : महामार्गावर टोल देण्यासाठी लागणाऱ्या लांबच लांब रांगांमधून आता वाहनधारकांची सुटका होणार आहे. कारण देशातील सध्याची टोल वसुली प्रणाली आता एक वर्षाच्या आत पूर्णपणे बंद केली जाईल आणि त्याऐवजी नवी इलेक्ट्रॉनिक टोल प्रणाली लागू केली जाणार आहे. या नवीन प्रणालीमुळे महामार्गावर वाहने न थांबता, विनाअडथळा प्रवास करणे शक्य होईल, अशी घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी लोकसभेत केली. याबाबत गडकरी म्हणाले, हायवे पूर्णपणे डिजिटल करण्याच्या उद्देशाने वाहन थांबवून शुल्क घेण्याची सध्याची पद्धत बंद करण्यात येत आहे. या नवीन बॅरियरलेस टोलिंग तंत्रज्ञानामुळे देशभरातील टोल प्लाझा नाहीसे होतील आणि वाहने टोल भरण्यासाठी न थांबता वेगात पुढे जाऊ शकतील. यामुळे टोलवरील लांब रांगा आणि वेळेची बचत होईल. पूर्वी टोल प्लाझावर गाड्यांना थांबून रोख किंवा कार्डने पैसे भरावे लागत होते. नंतर फास्टॅग आल्याने थांबण्याचा वेळ कमी झाला. आता पुढील पाऊल बॅरियर नसलेल्या हायटेक टोलच्या दिशेने आहे. यासाठी नॅशनल पेमटस् कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने नॅशनल इलेक्ट्रॉनिक टोल कलेक्शन ( NETC ) कार्यक्रम तयार केला आहे. हे संपूर्ण देशासाठी एकसमान आणि परस्परांशी जोडलेले इलेक्ट्रॉनिक टोल प्लॅटफॉर्म आहे. याचा उद्देश वेगवेगळ्या महामार्गांवरील वेगवेगळ्या प्रणालींची अडचण दूर करणे आणि नवीन प्रणालीची सुरुवात करणे हा आहे.

## दिनविशेष

**सोमवार दि. १५ डिसेंबर ते २८ डिसेंबर २०२५**
**माहे मार्गशिर्ष/पौष , शके १९४७**

**❋ सोमवार दि. १५ डिसेंबर २०२५**
मार्गशीर्ष कृष्ण एकादशी, स्वाती नक्षत्र, सफला एकादशी, श्री यल्लमा यात्रा- खंडेराजूरी.

**❋ मंगळवार दि. १६ डिसेंबर २०२५**
मार्गशीर्ष कृष्ण व्दादशी, स्वाती नक्षत्र, यल्लमा यात्रा -जत व घानवड (विटा), साखरपुडा मुहुर्त.

**❋ बुधवार दि. १७ डिसेंबर २०२५**
मार्गशीर्ष कृष्ण त्रयोदशी, विशाखा नक्षत्र.

**❋ गुरुवार दि. १८ डिसेंबर २०२५**
मार्गशीर्ष कृष्ण चतुर्दशी, अनुराधा नक्षत्र, यल्लमा यात्रा कलेढोण, सेवागिरी महाराज रथोत्सव पुसेगाव.

**❋ शुक्रवार दि. १९ डिसेंबर २०२५**
मार्गशीर्ष कृष्ण अमावस्या, जेष्ठा नक्षत्र, अमावस्या पहाटे ४.५९ सुरु.

**❋ शनिवार दि.२० डिसेंबर २०२५**
मार्गशीर्ष कृष्ण अमावस्या, मूळ नक्षत्र, अमावस्या सकाळी ७.१२ पर्यंत, संत गाडगेबाबा पुण्यदिन.

**❋ रविवार दि.२१ डिसेंबर २०२५**
पौष शुक्ल प्रथमा, पूर्वाषाढा नक्षत्र, उत्तरायणारंभ, सौर शिशिर ऋतू प्रारंभ.

**❋ सोमवार दि. २२ डिसेंबर २०२५**
पौष शुक्ल व्दितीया, उत्तराषाढा नक्षत्र, श्री नृसिंह सरस्वती जयंती.

**❋ मंगळवार दि. २३ डिसेंबर २०२५**
पौष शुक्ल तृतीया, श्रवण नक्षत्र, विनायक चतुर्थी

**❋ बुधवार दि. २४ डिसेंबर २०२५**
पौष शुक्ल चतुर्थी, धनिष्ठा नक्षत्र, यल्लामा देवी यात्रा-सावळज, साखरपुडा मुहुर्त

**❋ गुरुवार दि. २५ डिसेंबर २०२५**
पौष शुक्ल पंचमी, धनिष्ठा नक्षत्र, ख्रिसमस.

**❋ शुक्रवार दि. २६ डिसेंबर २०२५**
पौष शुक्ल षष्ठी, शततारका नक्षत्र, जावळ मुहुर्त

**❋ शनिवार दि. २७ डिसेंबर २०२५**
पौष शुक्ल सप्तमी, पूर्वा भाद्रपदा नक्षत्र, श्री .खंडोबा यात्रा करंजे.

**❋ रविवार दि. २८ डिसेंबर २०२५**
पौष शुक्ल अष्टमी, उत्तरा भाद्रपदा नक्षत्र, दुर्गाष्टमी, शांकभरीदेवी नवरात्रारंभ, साखरपुडा व जावळ मुहुर्त.

# दक्षता अधिकाऱ्यांनी उघडकीस आणला ५४ कोटींचा घोटाळा

**तिरुमला** : तिरुपती देवस्थानमध्ये एक नवीन घोटाळा उघडकीस आला आहे. दक्षता अधिकाऱ्यांनी २०१५ ते २०२५ या दहा वर्षांच्या कालावधीत रेशमी उपरण्यांच्या खरेदीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचे शोधून काढले आहे. भेसळयुक्त लाडू वाद आणि परकापणी प्रकरणानंतर, आता अधिकाऱ्यांनी १०० टक्के पॉलिस्टर सिल्क मिश्रणाचे बिल दाखवून प्रत्यक्षात बनावट रेशमी उपरणी पुरवण्यात आल्याचे शोधून काढले आहे. या घोटाळ्यामुळे ५४ कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान झाल्याचा अंदाज आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, एका कंत्राटदाराने सुमारे १५,००० उपरणी प्रति नग १,३८९ रुपये दराने पुरवली आणि ती रेशमाची असल्याचा दावा केला. मात्र, केंद्रीय रेशीम मंडळासह दोन प्रयोगशाळांमध्ये पाठवलेले नमुने तपासले असता, ही उपरणी रेशमाची नसून पॉलिस्टरची असल्याचे सिद्ध झाले. पट्टू वस्त्रालू (रेशमी उपरणी) घोटाळ्यावर प्रतिक्रिया देताना टीटीडीचे अध्यक्ष बी. आर. नायडू म्हणाले, खरेदी विभागात काही अनियमितता झाल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. याची दखल घेत आम्ही हे प्रकरण लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे सोपवले आहे. तिरुपती लाडू वाद सप्टेंबर २०२४ मध्ये उघडकीस आला होता, जेव्हा आंध्र प्रदेशच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी मंदिरात वाटल्या जाणाऱ्या लाडूंमध्ये गायीच्या शुद्ध तुपाऐवजी प्राण्यांची चरबी किंवा भेसळयुक्त तूप असण्याची शक्यता असल्याचा आरोप केला होता.

# मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या चालकास वर्षाची शिक्षा

**विटा** : निष्काळजीपणे भरधाव वाहन चालवून दोघांच्या मृत्यूला कारणीभूत ठरल्याप्रकरणी चालक दीपक सातप्पा रानमाळे (वय ४०, रा. मांगेवाडी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर) यास विटा न्यायालयाने एक वर्षाची शिक्षा सुनावली. येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पल्लवी सूर्यवंशी यांनी ही शिक्षा सुनावली. नऊ वर्षांपूर्वी हा अपघात झाला होता. १६ मे २०१६ रोजी विट्याच्या मायणी रस्त्यावरील लकडे पेट्रोल पंपाजवळ एक कार आणि दोन मोटरसायकली यांच्यात अपघात झाला होता. भरधाव वेगाने दीपक रानमाळे हा कार चालवत मायणीकडून विट्याकडे येत होता. त्यावेळी समोरच्या ट्रॅक्टरला ओव्हरटेक करण्याच्या नादात त्याची कार विरुद्ध दिशेला आली आणि राजेंद्र गणपती माळी (वय ४५) व सूरज राजेंद्र माळी (वय १८, दोघेही रा. माहुली, ता. खानापूर, जि. सांगली) यांच्या दुचाकीला जोरदार धडकली. तसेच नियंत्रण न झाल्यामुळे त्यामागून येणाऱ्या दुसऱ्या दुचाकीला कारने कट मारला. या दुसऱ्या दुचाकीवरील खानापूर तालुक्यातील देविखिंडी येथील जोडपे विशाल अशोक सवणे आणि पत्नी तेजस्विनी सवणे यांनाही जखमी केले होते. अपघातानंतर राजेंद्र आणि सूरज माळी यांना तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र तेथे त्यांचा मृत्यू झाला होता. अपघातात तिन्ही गाड्यांचेही मोठे नुकसान झाले होते. याबाबत विटा पोलिसांमध्ये १७ मे २०१६ रोजी गुन्हा दाखल झाला होता. सरकारी वकील म्हणून शारदा गायकवाड यांनी काम पाहिले.

# कडक्याच्या थंडीने ठिकठिकाणी पेटल्या शेकोट्या



**तासगाव** : हिवाळ्यातील सर्वात जास्त थंडी या आठवड्यात जाणवू लागल्याने अनेक ठिकाणी शेकोट्या पेटल्याचे चित्र दिसून येत आहे. शेकोटीच्या भोवती ऊब घेण्यासाठी गर्दी दिसून येत आहे. यावर्षी सर्वच ऋतुंनी आपली हजेरी जास्त प्रमाणात दाखविली आहे. पावसाळ्यानंतर येणारा हिवाळा तितकाच कमालीचा गारवा घेऊन आला आहे. सुमारे पंधरा दिवसांपासून थंडीने आपली चाहूल वाढवून स्वेटर, गरम ऊबदार कपडे, कानटोपी, मफलर, हातमोजे वापरण्यास भाग पाडले आहे. चौका- चौकात शेकोट्या पेटवून ग्रामस्थ व तरुण शेकोट्यांची ऊब सकाळी व संध्याकाळी घेत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी पाहायला मिळत आहे. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी थंडीचा कालावधी वाढण्याची चिन्हे आहेत. अजून काही दिवस थंडीने आपला मुक्काम वाढविला तर याचा परिणाम गहू पीक वगळता इतर पिकांची वाढ थांबवू शकते. हरभरा, गहू ही पिके मात्र जोमदार असून त्यांच्यासाठी हे वातावरण पोषक आहे. लहान मुले, वृद्ध नागरिकांना ही थंडी त्रासदायक ठरत आहे. थंडी, ताप, सर्दी, खोकला यांनी नागरिक बेजार झाले असून उपचाराकरिता दवाखान्यात गर्दी करीत आहेत. थंडीमुळे दररोज सकाळी व्यायाम करण्यासाठी बाहेर फिरायला जाणारी मंडळी या आठवड्यात तुरळक दिसून येत आहेत. कडाक्याच्या थंडीने शरीराचे होणारे हाल व शारीरिक त्रास अनेकांना सहन करावा लागत आहे. वरून कितीजरी ऊबदार कपडे घातले तरी थंडी मात्र आपली चाहूल दाखवीत आहे.

# व्यापाऱ्यांनी हळदीचे दर पाडून शेतकऱ्यांचे २५ हजार कोटी लुटले

**जयसिंगपूर** : वायदेबाजाराच्या माध्यमातून मूठभर व्यापारी हळदीचे दर पाडत आहेत. गेल्या १० वर्षांत या व्यापाऱ्यांनी याच पद्धतीने वायदेबाजारातून हळदीचे दर पाडून २५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रुपयांची शेतकऱ्यांची लूट केलेली आहे. या गैरव्यवहाराची सीबीआय मार्फत चौकशी करण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे. राज्यातील सांगली, हिंगोली, नांदेड, परभणी, चंद्रपूर, सातारा, कोल्हापूर, सोलापूर आणि वाशिम जिल्ह्यातील हळद उत्पादक शेतकरी व्यापारी व एनसीडीईएक्सच्या जाळ्यात अडकवून अक्षरश: भरडला जात आहे. काही मूठभर मोठे व्यापारी एनसीडीईएक्सवर चालणाऱ्या वायदेबाजाराचा वापर करून हळदीचे दर पाडण्याचे कटकारस्थान करीत आहेत. गेल्या १० वर्षांत मूठभर व्यापाऱ्यांनी याचपद्धतीने वायदेबाजारातून हळदीचे दर पाडून २५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रुपयांची लूट केलेली आहे.

# बोलबाला




## वर्ल्ड गोल्ड कौन्सिलचा सोन्याबद्दलचा २०२६ साठीचा अंदाज जाहीर

**नवी दिल्ली** : भू-राजकीय तणावामुळे जागतिक व्यापारावर विपरीत परिणाम होत आहे. परिणामी सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याकडे निधीचा ओघ वाढत आहे. त्यामुळे कॅलेंडर वर्ष २०२६ मध्ये सोन्याचे दर १५ ते २० टक्क्यांनी वाढू शकतात, असा अंदाज वर्ल्ड गोल्ड कौन्सिलने (डब्ल्यूजीसी) वर्तविला आहे. अमेरिकेचे कर विषयक धोरण आणि भू-राजकीय संघर्षामुळे २०२५ मध्ये अनेकांनी सोन्यात गुंतवणूक करणे पसंत केले. विविध बँकांनीदेखील गुंतवणूक वाढविली. बँकेकडील १०० अब्ज डॉलरचा



देशांच्या मध्यवर्ती सोन्यातील भारतीय रिझर्व्ह सुवर्णसाठ्याने टप्पा पार केला आहे. परिणामी वर्षभरात सोन्याच्या किंमतीत सुमारे ५३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. घटणारे उत्पन्न, वाढलेले भू- राजकीय ताण आणि सुरक्षिततेसाठी सोन्यामध्ये गुंतवणूक करण्याचा कल वाढेल. त्यामुळे सोन्याच्या दरात वाढ होईल, असे गोल्ड कौन्सिलच्या अहवालात म्हटले आहे. विशेषतः गोल्ड एक्सचेंज ट्रेडेड फंडस् (ईटीएफ) द्वारे सोन्यात मोठी गुंतवणूक होईल. दागिन्यांच्या खरेदीतील होणारी घट एकप्रकारे ईटीएफद्वारे भरून निघेल, असेही अहवालात म्हटले आहे.

## चवताळलेल्या बिबट्याला बैलाने घेतले शिंगावर



**सातारा** : तालुक्यातील खालची पिलाणी परिसरात शनिवार दि.२२ नोव्हेंबर रोजी सकाळी बैल व बिबट्याची जीवघेणी झुंज झाली. चवताळून हल्ला करणाऱ्या बिबट्याचा दोन बैलांनी तितकाच कडवा प्रतिकार केला. या जीवघेण्या झुंजीत एका बैलाचे शिंग मोडले असून तो रक्तबंबाळ झाला. बैलाच्या शरिरावर गंभीर जखमा झाल्या आहेत. शेतकऱ्यांचा आरडाओरडा व बैलांचा कडवा प्रतिकार यामुळे अखेर बिबट्याने धूम ठोकली. डोंगराच्या पायथ्याशी हा थरारक प्रकार घडला. बळीराम कदम हे शनिवारी सकाळी डोंगरात दोन बैल चरावयास घेऊन गेले होते. अकरा वाजण्याच्या सुमारास त्यांच्या बैलांवर बिबट्याने हल्ला केला. दोन्ही बैलही त्याला कडवा प्रतिकार करत हल्ला परतवून लावत होते. त्यांच्यामध्ये जोरदार झुंज सुरु होती. यात राजा बैलाचे एक शिंग तुटले. राजा रक्ताने माखला. त्याच्या शरीरावरही बिबट्याच्या नख्यांमुळे गंभीर जखमा झाल्या. बिबट्या पुन्हा पुन्हा मागे फिरुन राजा बैलावर हल्ला करत असतानाच आरडाओरडा आरडाओरडीमुळे आणि बैलांच्या प्रतिकारामुळे अखेर बिबट्या पळून गेला.

# इलेक्ट्रिक वाहनधारकांकडून केलेली टोल वसुली बेकायदेशीर





**नागपूर** : इलेक्ट्रिक वाहनांसाठी टोलमाफी लागू करण्याचा शासन निर्णय (जीआर) जारी झाल्यानंतरही वाहनधारकांकडून करण्यात आलेली टोल वसुली पूर्णपणे बेकायदेशीर आहे. त्यामुळे जीआर निघाल्यानंतर वसूल केलेला टोल तातडीने वाहनधारकांना परत करण्याची व्यवस्था करा. तसेच, ई-वाहनांसाठी टोलमाफीसाठीची कार्यवाही ८ दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सरकारला दिले. त्यानुसार सरकारने या निर्देशांनुसार कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. राज्य सरकारने ई-वाहनांसाठी अटल सेतू, समृद्धी महामार्ग आणि मुंबई-पुणे महामार्गावर टोल माफ करण्याची घोषणा केल्यानंतरही टोल वसुली सुरू असल्याचा प्रश्न आमदार अनिल पाटील यांनी विधानसभेत मांडला होता. बेकायदेशीरपणे वसूल केलेला टोल परत केला जाणार का, अशी विचारणाही त्यांनी केली. यावेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना मंत्री दादा भुसे यांनी, या तिन्ही मार्गांवर ई-वाहनांना टोलमाफीचे धोरण २३ मे २०२५ रोजी जाहीर करण्यात आले असून, २२ ऑगस्ट २०२५ पासून अंमलबजावणी सुरू केल्याचे सांगितले. तसेच, टोलमाफीच्या निर्णयानंतर झालेल्या वसुलीचे कारण सांगताना ईव्ही फास्टॅग रजिस्ट्रेशन, एनआयसी डेटाबेसमधील नोंदणी आणि बँक इंटिग्रेशनच्या प्रक्रियेकडे त्यांनी अंगुलीनिर्देश केला. आठ दिवसांत आवश्यक कार्यवाही पूर्ण करा त्यांच्या या उत्तरावर खुद्द विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनीच आश्चर्य व्यक्त करीत मंत्री भुसे आणि सरकारलाच जीआरचा अर्थ समजावत फटकारले. जीआर काढला याचाच अर्थ सरकारने सर्वसामान्य नागरिकांना शब्द दिला. त्यामुळे जीआरच्या तारखेनंतर टोल वसुली झाली असेल, तर सरकारने जनतेला दिलेला शब्द मोडला. जीआरमधील नमूद तारखेनंतर कोणत्याही ई- वाहनाची टोल वसुली झाली असेल, तर संबंधितांनी त्याचे पुरावे दिल्यास टोलची रक्कम परत करा. तसेच, आठ दिवसांत या तिन्ही मार्गांवर ई- वाहनांच्या टोलमाफीसाठी आवश्यक कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्ष नार्वेकर यांनी सरकारला दिले. तसेच राज्यातील अपुऱ्या चार्जिंग स्टेशन्सचा मुद्दाही उपस्थित करत, ई-वाहनांसाठी किमान १२० केव्ही क्षमतेची फास्ट चार्जिंग स्टेशन्स उभारण्याची गरज असल्याचेही विधानसभा अध्यक्ष नार्वेकर यांनी स्पष्ट केले. सध्या उपलब्ध चार्जिंग स्टेशन्सवर वाहन चार्जिंगसाठी आठ तास लागत असल्याने ही व्यवस्था तातडीने सुधारावी, अशी सूचना त्यांनी केली.

# विट्याच्या वीराचा शिवप्रतापतर्फे गौरव



**विटा** : येथील सावरकर नगरमधील 'हनुमान स्टील' या दुकानाला आणि राहत्या घराला काही दिवसांपूर्वी भीषण आग लागली होती. ज्वाळांचे प्रचंड लोट आणि धूराचा भरलेला परिसर पाहून नागरिकांमध्ये भीती आणि गोंधळ निर्माण झाला होता. या जीवघेण्या प्रसंगात एक क्षणही न दवडता, होमगार्ड लखन भुमकर यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून आगीकडे धाव घेत अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यासाठी अदम्य धैर्य दाखवले. त्यांनी जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल केले आणि मानवतेचे आश्चर्यकारक उदाहरण घालून दिले. या शौर्यपूर्ण पराक्रमाचा गौरव करण्यासाठी शिवप्रताप मल्टीस्टेट तर्फे होमगार्ड लखन भुमकर आणि त्यांच्या परिवाराचा भव्य सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमप्रसंगी विटा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अभिजीत कणसे यांनी संस्थेच्या सामाजिक उपक्रमाचे विशेष कौतुक केले आणि संकटाच्या काळात मानवतेला प्राधान्य देणाऱ्या अशा गौरव उपक्रमासाठी शिवप्रताप संस्थेला मनःपूर्वक धन्यवाद दिले. त्यांनी भुमकर यांच्या धाडसाबद्दलही गौरवोद्गार काढत समाजासाठी अशा नायकांचे अस्तित्व प्रेरणादायी असल्याचे नमूद केले. या कार्यक्रमास शिवप्रताप संस्थेचे चेअरमन मा. शेखर साळुंखे, व्हा.चेअरमन हणमंतराव सपकाळ, कार्यकारी संचालक विठ्ठलराव साळुंखे, बँकिंग सल्लागार अशोक नाईक यांच्यासह संस्थेचे अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मानवतेसाठी जीव धोक्यात घालणाऱ्या विट्याच्या वीराचा हा सन्मान सोहळा संपूर्ण परिसरात अभिमानाचा विषय ठरला.


ॐ श्री गुरुमाऊली Special

आमचेकडे लाकडी घाण्यातील
तेल वापरुन देशी मालापासून बनविलेल्या
विविध प्रकारच्या चटण्या, स्पेशल मसाले,
खपली गव्हापासून बनविलेल्या विविध स्वादातील
शेवया तसेच स्पेशल व्हेज व नॉनव्हेज ग्रेव्ही मिळेल.
प्रोप्रा : खताळ बंधू 8554848714, 9595028934
घर क्रं. ३४१९/२, ओम श्री गुरुमाऊली निवास, आहिल्यादेवी नगर,
साळशिंगे रोड, विटा-४१५ ३११, ता. खानापूर, जि. सांगली (महाराष्ट्र)

# रेल्वेमध्ये चोऱ्या करणारी सराईत टोळी जेरबंद



**मिरज :** गांधीधाम ते बंगळूर एक्स्प्रेसमध्ये दोन महिलांच्या दागिन्यांवर डल्ला मारणाऱ्या हरियाणामधील सराईत टोळीला दिल्ली विमानतळावरून बेड्या ठोकण्यात आल्या. मिरज रेल्वे, पुणे रेल्वे, पुणे रेल्वे सुरक्षा दल आणि दिल्ली गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली. टोळीतील पाच जणांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना ९ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. अटक करण्यात आलेल्यांमध्ये कुलदीप (वय ३४), अजय (वय ३६), हवा सिंग (वय ६५, तिघे रा. जिंद, हरियाणा), अमित कुमार (वय ३५), मोनू (वय ३२, दोघे रा. भिवानी, हरियाणा) यांचा समावेश आहे. गांधीधाम- बंगळूर एक्स्प्रेसमध्ये दि. २९ नोव्हेंबर रोजी शिवानी प्रतीक जाधव आणि रेखा मनोजकुमार मालपाणी या महिलांचे दागिने चोरीला गेले होते. याच रेल्वेतून प्रवास करणाऱ्या ८ जणांच्या टोळीने शिवानी जाधव यांच्या ३ लाख रुपयांच्या तर रेखा मालपाणी यांच्या २३ तोळे सोन्यावर डल्ला मारला होता.

याबाबत मिरज रेल्वे पोलिस आणि संजयनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यामुळे मिरज रेल्वे पोलिस, पुणे रेल्वे पोलिस, रेल्वे सुरक्षा दल या घटनेचा तपास करीत होते. मिरज रेल्वे पोलिसांनी मिरज यार्डमधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केल्यानंतर यामध्ये ८ जण आढळून आले होते. त्यांचा माग काढला असता सुरुवातीला ते सांगली बस स्थानक, त्यानंतर कोल्हापूर व तेथून गोव्यात गेल्याचे समोर आले. पोलिस मागावर असल्याची चाहूल लागताच पाच जणांनी गोव्यातून विमानाने दिल्लीकडे पलायन केले होते. यावेळी सुरू असणाऱ्या तांत्रिक तपासादरम्यान त्यांचे लोकेशन पोलिसांना मिळून आले. त्यानंतर तातडीने दिल्ली गुन्हे शाखेला याबाबत माहिती देण्यात आली. गोव्यातून निघालेले विमान दिल्लीत पोहोचेपर्यंत दिल्ली गुन्हे शाखेने विमानतळावर सापळा लावला. वरील पाचही संशयित दिल्ली विमानतळावर पोहोचताच त्यांना अटक करण्यात आली. हरियाणात 'सांसी' नावाने कुप्रसिद्ध असलेल्या सदर टोळीनेच रेल्वेत दोन महिलांचे दागिने चोरल्याचे तपासात स्पष्ट झाले. संबंधित टोळी सराईत असून त्यांनी यापूर्वी रेल्वेत चोऱ्या केल्या आहेत का, याचा तपासही पोलिसांकडून करण्यात येत आहे.

## विशाल विटाच्या वाचकांसाठी खुशखबर !

**आजच्या बातम्या आजच आपल्या मोबाईलवर वाचण्यासाठी किंवा ऐकण्यासाठी आताच विशाल विटाचा 'ॲप' डाऊनलोड करा. अँड्राईड मोबाईलसाठी 'प्ले' स्टोअरवरुन व आयफोनसाठी 'ॲप' स्टोअरवरुन विशाल विटाचा ॲप डाऊनलोड करा.**

# गाडीवरील नियंत्रण सुटल्याने झालेल्या अपघातात तरुण ठार

**आटपाडी :** भिवघाट - दिघंची रस्त्यावर मानेवाडीजवळ शनिवार दि.६ डिसेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात करगणी येथील रिहान जमीर मुल्ला (वय १६) हा जागीच ठार झाला, तर चालकासह चारजण गंभीर जखमी झाले. या अपघाताची नोंद आटपाडी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. कार (एमएच १४, डीएफ ९००९) ही खरसुंडीहून नेलकरंजीमार्गे करगणीकडे जात होती. शनिवारी रात्री कारचा वेग जास्त असल्याने चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले. मेटकरवाडी बसस्थानकाजवळील दुकान गाळ्यांच्या भिंतीजवळ गाडी आदळली. दरम्यान, हा धक्का एवढा प्रचंड होता की कारने उड्डाण घेत सुमारे २०० फूट अंतरावर बाजूच्या रानातील खोल खड्ड्यात जाऊन कोसळली. या भीषण अपघातात गाडीत मागील सीटवर बसलेला रिहान जमीर मुल्ला याचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य चौघेजण गंभीर जखमी असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही पाचही मुले रात्री १० च्या सुमारास करगणीहून खरसुंडीला कारचे कूलंट भरून आणण्यासाठी गेली होती. त्यानंतर त्यांनी तेथे जेवण केले आणि मध्यरात्रीनंतर खरसुंडीतून परत येऊ लागले. मेटकरवाडीजवळ येताच वेगाचा अंदाज न आल्याने हा भीषण अपघात घडला.

# गुंगीचे औषध लावून ३५ हजाराची रोकड लंपास

**जत :** येथील वळसंग रस्त्यावरील एका पेट्रोल पंपाजवळ दोघांच्या तोंडाला गुंगीचे औषध लावून त्यांच्याजवळील ३५ हजारांची रोकड लंपास करण्यात आली. सदरची घटना मंगळवार दि. ९ डिसेंबर रोजी दुपारी घडली. सुखदेव बंडू करे (वय ४०) व शंभू खराडे (५५) अशी लूट झालेल्यांची नावे आहेत. याबाबत आधिक माहिती अशी की, सुखदेव करे हे मंगळवारी दुपारी गावातील खराडे यांना घेऊन वळसंगमार्गे जतला निघाले होते. एका पेट्रोल पंपाजवळ सुखदेव करे यांची दुचाकी चौघांनी थांबवली. त्यांनी करे व खराडे यांना बोलण्यात गुंतवले. त्याचवेळी त्यांच्या तोंडाला गुंगी येणारे औषध लावले. गुंगीचे औषध लावताच दोघेही बेशुद्ध झाले. त्यानंतर करे यांच्याजवळील ३५ हजाराची रोकड त्यांनी काढून घेतली. दोघांनाही जवळच्या शेतात टाकून चौघांनीही पलायन केले. सायंकाळी घटनेची माहिती १०८ वाहनावर चालक असलेले योगेश मोटे यांना मिळाली. त्यांनी दोघांना जत ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. रात्री उशिरापर्यंत करे हे शुद्धीत आले नव्हते. खराडे यांनी चौघांनी गुंगीचे औषध तोंडाला लावून बेशुद्ध केले व रोकड लंपास केल्याचे सांगितले.

# डिजिटल अरेस्टची भीती दाखवून ५५ लाखांची फसवणूक

**इचलकरंजी :** डिजिटल अरेस्टची भीती दाखवून आण्णासो व्हनगोंडा पाटील (वय ७९, रा. टाकवडे वेस) या वृद्धाची ५४ लाख ८५ हजार ६२४ रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी गावभाग पोलिस ठाण्यात दोघा अनोळखीं विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. फिर्याद आण्णासो पाटील यांनी दिली आहे.

# शेतकऱ्यांसाठी 'बळीराजा रस्ते' योजना प्रभावीपणे राबविणार

**नागपूर** : राज्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा असलेला शेत रस्त्यांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी स्वतंत्र योजना राबविण्यासह मुंबईतील गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासातील अडथळे दूर करणारे, तसेच वर्ग २ च्या जमिनी वर्ग १ करण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत निवेदनाद्वारे दिली. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतापर्यंत पोहोचण्यासाठी बारमाही आणि मजबूत रस्ते उपलब्ध करून, पुनर्विकासासाठी वर्ग-२ च्या जमिनी वर्ग १ करण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ, रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी लागणाऱ्या गौण खनिजावरील रॉयल्टी माफ देण्याच्या उद्देशाने महसूल विभागामार्फत 'मुख्यमंत्री बळीराजा शेत, पाणंद रस्ते योजना' राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. शेतीतील यांत्रिकीकरण लक्षात घेऊन ही योजना पूर्णपणे यंत्रसामग्रीच्या साहाय्याने राबविली जाईल. गाव नकाशावर दर्शविलेल्या रस्त्यांवरील अतिक्रमणे या योजनेंतर्गत त्वरित हटविली जाणार आहेत. या रस्त्यांसाठी लागणारी तातडीची मोजणी आणि पोलिस बंदोबस्त शुल्क शासनाने पूर्णपणे माफ केले आहे. तसेच, रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी लागणारा गाळ, माती, मुरूम किंवा दगडासाठी कोणतेही स्वामित्व शुल्क (रॉयल्टी) आकारले जाणार नाही. खर्चासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष तयार केले जाणार आहे.

मुंबईतील अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारती मोडकळीस आल्या असून, त्यांना स्वयंपुनर्विकासासाठी प्रोत्साहन देणारा निर्णय घेण्यात आला आहे. प्रधानमंत्री आवास योजनेसाठी वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकाच्या (एफएसआय) पैकी २५ टक्के चटई क्षेत्र उपलब्ध करून देण्याच्या अटीमुळे सोसायट्यांना योजनेचा लाभ घेता येत नव्हता. आता स्वयंपुनर्विकास करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी ही २५ टक्के एफएसआयची अट वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वर्ग-२ जमिनींचे वर्ग-१ मध्ये रूपांतर करण्यास मुदतवाढही देण्यात आली आहे. भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनींचे भोगवटादार वर्ग-१ (फ्री होल्ड) मध्ये सवलतीच्या दराने रूपांतर करण्याच्या योजनेला मुदतवाढ देण्यात आली आहे. ही सवलत योजना ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत होती, ती आता एक वर्षाने वाढवून ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत करण्यात आली आहे. न्यायालयीन प्रकरणे किंवा नियोजन कारणांमुळे जमिनीचा वापर करण्यास ५ वर्षांपेक्षा जास्त विलंब झाला असल्यास, शासनाची खात्री पटल्यावर वापराबाबतची ५ वर्षांची अट शिथिल करण्यात येईल. खासगी संस्थांना रेडीरेकनरच्या १० टक्के, तर स्वयंपुनर्विकासासाठी ५ टक्के निधी भरावा लागणार आहे. मुंबई शहर व उपनगरांतील शासकीय जमिनींवर ९०, ९९ किंवा ९९९ वर्षांच्या दीर्घ मुदतीचे भाडेपट्टे आहेत, त्यांच्या दरात सुधारणा करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. ज्या जमिनींच्या करारात विशिष्ट कालावधीनंतर दर सुधारण्याची तरतूद आहे, तिथे शासनाच्या २५ टक्के मूल्यांकनावर सुधारित भाडेपट्ट्याची रक्कम निश्चित करून वसूल करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच, मूळ भाडेपट्टाधारकाकडून जमिनीचा ताबा सहकारी संस्थेकडे हस्तांतरित झाला असल्यास, अनर्जित उत्पन्न वसूल करून संस्थेच्या नावे भाडेपट्टा नूतनीकरण केले जाईल, असे बावनकुळे म्हणाले.

# नव्या स्मार्ट मीटरची गती अधिक असल्याने शेतकऱ्यांना भुर्दंड



**सातारा** : ग्रामीण भागातील ग्राहकांनी या स्मार्ट मीटरला विरोध दर्शवला आहे. वास्तवात या स्मार्ट मीटरची गती ही साध्या मीटरच्या तुलनेत ६० टक्क्यांपेक्षा अधिक असल्याचे प्रात्यक्षिकाद्वारे सिद्ध झाले आहे. त्यामुळे ग्राहकांना सध्याच्या वीजबिलापेक्षा किमान ६० ते ७० टक्के अधिक रक्कम मोजावी लागेल, अशी शक्यता वर्तवली जात असल्याने ग्राहकांमध्ये धास्ती आहे. प्रशासन वीज गळती, वीजचोरी, अंतर्गत भ्रष्टाचार, भारनियमन या महत्त्वाच्या बाबींवर लक्ष्य केंद्रित करण्याऐवजी विजेच्या मीटरवर काम करत आहेत. सन २०१५ पासून राज्यात प्री-पेड मीटरची चर्चा सुरु झाली. ग्राहकांनी या मीटरला विरोध दर्शवायला सुरुवात करताच महावितरण कंपनीने राज्यातील विजेच्या एकूण नऊ लाख मीटरची तपासणी केली. यात सात लाख मीटर फॉल्टी आढळून आल्याने राज्याच्या ऊर्जा मंत्रालयाने माघार घेत फेब्रुवारी २०१७ मध्ये प्री-पेड मीटर लावले जाणार नसल्याचे स्पष्ट केले. जानेवारी २०२५ पासून या प्री-पेड मीटरला पर्याय म्हणून स्मार्ट मीटरची चर्चा सुरु झाली. स्मार्ट मीटरची गती ही साध्या मीटरच्या तुलनेत अधिक आहे. त्यामुळे वीज बिलात अगोदरच भुर्दंड लागत असताना आता नव्याने नवीन स्मार्ट मीटर बसवण्यासाठी प्रत्येक मीटरला तब्बल १२ हजार रुपये मोजावे लागणार आहेत. त्यामुळे शेतकरी महावितरणवर नाराज आहेत.


## विशाल विटाच्या वर्गणीदारांसाठी महत्वाचे !

सर्व भारतभर विखूरलेल्या विशाल विटाच्या तमाम वर्गणीदारांना विनंती आहे की, आपली वार्षिक वर्गणी ऑनलाईन पाठवून सहकार्य करावे. इलेक्ट्रॉनिक व सोशल मिडियाच्या वाढत्या प्रभावामुळे वृत्तपत्र चालविणे जिकीरीचे झाले आहे. आता आपल्याकडे समक्ष येवून वर्गणी गोळा करणे व्यवहारीकदृष्टया परवडत नाही. तरी आपण आपली वार्षिक वर्गणी ऑनलाईन पाठवावी. आपल्या बातम्या व जाहिराती ९८ २३४७ २४२५ या व्हाटस्‌अप नंबरवर पाठवाव्यात !

टीप - कृपया वरील क्यूआर कोड स्कॅन करुन आपली वर्गणी पाठवावी.

# ब्रेकरने भिंत तोडून सराफी दुकानातून केली साडेनऊ लाखांची लूट



**ताकारी** : येथील बस स्थानकाजवळील सराफी दुकान फोडून चोरट्यांनी शोकेसमधील साडेचार तोळ्यांचे सोन्याचे दागिने, साडेसहा किलो चांदी आणि १० हजारांची रोकड, असा ९ लाख ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. हा चोरीचा प्रकार शनिवार, दि.१३ डिसेंबर रोजी सकाळी उघडकीस आला. याप्रकरणी सराफ दुकानदार महेश हणमंत पाटील (वय ४२, रा. बांबवडे, ता. पलूस) यांनी ईश्वरपूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. घटनास्थळी श्वानपथक, ठसेतज्ज्ञांना पाचारण आले होते. स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पथक पुढील तपास करत आहे. याबाबत आधिक माहिती अशी की, ताकारी बसस्थानक परिसरात संतोष पाटील यांच्या मालकीचे ‘महालक्ष्मी ज्वेलर्स’ नावाचे सराफी दुकान आहे. शुक्रवारी सायंकाळी संतोष पाटील दुकान बंद करून घराकडे गेले होते. शनिवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास ते दुकानात आले, त्यावेळी दुकानातील साहित्य विस्कटले होते. संतोष पाटील यांच्या दुकानात लॉकर आहे. मात्र शुक्रवारी त्यांची तब्येत अचानक बिघडल्याने त्यांनी शोकेसमधील ऐवज तसाच ठेवून ते घरी गेले होते. चोरट्यांनी रात्रीत दुकानाची मागची भिंत ब्रेकरने फोडली. त्यासाठी तेथील परिसरातील विद्युत पेटीतून वीज घेतल्याचे समोर आले आहे. चोरट्यांनी भिंत फोडून दुकानात प्रवेश केला. आतील लॉकरही फोडण्याचा प्रयत्न चोरट्यांनी केल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. दुकानातील शोकेसमधील २५ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन, ८.९६० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन, १० ग्रॅमचे सोन्याचे मणी, ४ किलो ४३ ग्रॅमचे फॅन्सी चांदीचे पैजण, ४७४ ग्रॅमचे डिझाईनचे चांदीचे लोडे वाळे, १६५ ग्रॅमचे फॅन्सी वेढण, ३६४ ग्रॅमचे फॅन्सी हुपरी पैंजण, २९१ ग्रॅमचे चांदीचे ब्रेसलेट, २२५ ग्रॅमची चांदीची चेन, ३५१ ग्रॅम वजनाची लक्ष्मी, गणपती व अन्नपूर्णा देवीची चांदीची मूर्ती, ४३८ ग्रॅम वजनाच्या चांदीच्या अंगठ्या, असे सोन्या व चांदीचे दागिने, दहा हजार रुपयांची रोकड, असा ९ लाख ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला होता.

# अनंत अडचणींवर मात करत ३ फुटी उंचीचा ‘गणेश’ बनला डॉक्टर



**गांधीनगर** : डॉक्टर बनणे हे लाखो विद्यार्थ्यांचे स्वप्न असते; पण हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आलेल्या अडचणींवर मात करणे सोपे नसते. गुजरातच्या भावनगर येथील गणेश बरैया यांनी जो संघर्ष केला, तो खऱ्या अर्थाने प्रेरणा देणारा आहे. गणेश बरैया यांची उंची केवळ ३ फूट आणि वजन फक्त २० किलो आहे; पण त्यांच्या स्वप्नांची उंची इतकी मोठी होती की, कोणताही अडथळा त्यांना रोखू शकला नाही. गणेश बरैया एका सामान्य कुटुंबातून येतात आणि आठ भावंडांपैकी एक आहेत. लहानपणापासूनच त्यांना बुटकेपणाची समस्या होती. मात्र, त्यांचे डॉक्टर बनण्याचे आणि लोकांची सेवा करण्याचे स्वप्न होते. २०१८ मध्ये जेव्हा त्यांनी एमबीबीएसमध्ये प्रवेशासाठी अर्ज केला, तेव्हा मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने त्यांना प्रवेश देण्यास नकार दिला; कारण त्यांची उंची डॉक्टर बनण्यासाठी योग्य नाही, असे सांगण्यात आले. हा नकार ऐकून कोणीही हार मानली असती; पण गणेश यांनी हिंमत सोडली नाही.

गणेश बरैया यांनी आपल्या शाळेचे प्राचार्य डॉ. दलपतभाई कटारिया यांच्या मदतीने कायदेशीर लढाई सुरू केली. त्यांनी आधी गुजरात उच्च न्यायालयात धाव घेतली; पण तिथेही निराशा मिळाली. तरीही त्यांनी धीर सोडला नाही आणि सुप्रीम कोर्टाचा दरवाजा ठोठावला. चार महिन्यांच्या प्रदीर्घ कायदेशीर लढाईनंतर, सुप्रीम कोर्टाने ऐतिहासिक निर्णय दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की, उंची कोणाच्याही स्वप्नांना अडवू शकत नाही आणि गणेश यांना एमबीबीएसमध्ये प्रवेश मिळाला. प्रवेश मिळाल्यावरही गणेश यांचा संघर्ष थांबला नाही. वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेणे सोपे नव्हते. लॅबमध्ये पोहोचणे, क्लासरूममध्ये बसणे, इंटर्नशिप करणे... या प्रत्येक कामात त्यांना अडचणींचा सामना करावा लागला; पण त्यांनी आपल्या हिंमत, मेहनत आणि कुटुंबीयांच्या पाठिंब्याने प्रत्येक आव्हान पार केले. आज इतक्या अडचणींनंतर, गणेश बरैया गुजरात सरकारमध्ये मेडिकल ऑफिसर म्हणून कार्यरत आहेत. ते लोकांवर उपचार करतात, त्यांचे प्राण वाचवतात आणि त्यांच्या यशाने सर्वांना प्रेरणा देत आहेत. त्यांची इच्छा आहे की, ते त्यांच्या आईसाठी पक्के घर बनवतील; कारण आजही त्यांचे कुटुंब कच्च्या घरात राहते. ते आपल्या कुटुंबाला चांगले आयुष्य देऊ इच्छितात आणि ज्या मुलांची स्वप्ने आर्थिक किंवा शारीरिक अडचणींमध्ये अडकतात, त्यांना मदत करू इच्छितात.



# सावरी गावच्या जळक्या वाड्यात सापडले ११५ कोटींचे ड्रग्ज



**सातारा :** जावली तालुक्यातील बामणोलीजवळील सावरी गावच्या हद्दीतील 'जळका वाडा' म्हणून परिचित असणाऱ्या एका शेडमध्ये मुंबई गुन्हे शाखेने शनिवार दि.१३ डिसेंबर रोजी पहाटे एमडी ड्रग्जच्या फॅक्टरीवर छापा टाकून कोट्यावधीचे ड्रग्ज (मेफेड्रॉन) जप्त केले. त्यामध्ये ५० कोटींचे साडेसात किलो एमडी ड्रग्ज, ३८ किलो द्रवरूप अंमली पदार्थ, ड्रग्ज निर्मितीसाठी लागणारा कच्चा माल साहित्याचाही समावेश असून हा मुद्देमाल ११५ कोटींचा असल्याचे गुन्हे शाखेने प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे. याप्रकरणी कारवाई करणाऱ्या पथकाने तिघांना अटक केली आहे. दरम्यान, एवढ्या मोठ्या प्रमाणात ड्रग्जचा साठा सापडण्याची सातारा जिल्ह्यातील ही पहिलीच वेळ आहे.

मुंबईच्या मुलुंड पश्चिम येथील दोघा इसमांकडून १३६ ग्रॅम मेफेड्रॉन हा अंमली पदार्थ जप्त केला. त्याचा तपास सुरू असताना घोडबंदर येथे राहणाऱ्या संशयिताच्या सांगण्यावरून पुणे येथील संशयिताचे नाव समोर आले होते. या संशयिताने अंमली पदार्थ सॅन्टोसा हॉटेल, रावेत, पुणेच्या समोर दिल्याचे सांगितले. त्यानंतर मुंबई पोलिसांनी या प्रकरणाच्या तपासासाठी दोन पथके तयार केली. एका संशयितास घोडबंदर रोड, ठाणे येथून दुसऱ्या संशयितास पुणे येथून अटक करण्यात आली होती. पुणे येथून ताब्यात घेतलेल्या संशयिताकडे कसून चौकशी केली. त्यावेळी संबंधित संशयित व त्याचे तीन सहकारी सावरी, ता. जावली या सातारा जिल्ह्यातील एका शेतात एम. डी. ड्रग्ज तयार करत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार मुंबई पोलिसांनी सावरी येथील संबंधित ठिकाणी शनिवारी पहाटे धडक मारली. बामणोली ग्रामपंचायतीअंतर्गत सावरी गावच्या हद्दीत गोविंद बाबाजी सिंदकर यांचा जळका वाडा आहे. पूर्वी या ठिकाणी म्हशींचा गोठा होता. या वाड्यातच एमडी ड्रग्जचा साठा सापडला. मुंबई क्राईम ब्रँचचे पथक पाच ते सहा वाहनांतून पहाटे थंडीतच सावरी गावात पोहोचले. या पथकाने या जळक्या वाड्याचा ताबा घेत छापेमारी सुरू केली. त्यावेळी या वाड्यात ड्रग्ज निर्मिती कारखानाच असल्याचे उघडकीस आले. आतमध्ये ड्रग्ज तयार करण्यासाठी आवश्यक असलेली काचेची भांडी, इलेक्ट्रिक मशिन, प्लास्टिक टब, ट्रे असे भरपूर साहित्य आढळून आले. त्याचबरोबर साडेसात किलो वजनाचा एमडी (मेफेड्रॉन) ड्रग्ज, ३८ किलो वजनाचे लिक्विड एमडी (मेफेड्रॉन) व अमली पदार्थ निर्मितीकरता आवश्यक कच्चा माल, साहित्य असा एकूण ११५ कोटी किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. याप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली. या प्रक्रियेसाठी संशयित चोरून लाईट वापरत असल्याचे पोलिस तपासात पुढे आले आहे. काही महिन्यांपूर्वी येथे तयार केलेले कोट्यवधी रुपयांचे ड्रग्ज अन्यत्र विक्री केल्याची माहितीही मिळत आहे. मात्र, याबाबत पोलिस अधिकाऱ्यांकडून अधिकृत दुजोरा देण्यात आलेला नाही. सदर ड्रग्ज प्रकरणात राजकीय वरदहस्त असल्याच्या चर्चा सुरू आहेत. ठाण्यातील माजी नगरसेवक प्रकाश शिंदे यांचे सावरीजवळ हॉटेल आहे. प्रकाश शिंदे हे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे बंधू आहेत. या हॉटेलमध्ये संशयित ओंकार डिगे हा राहत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. त्याचबरोबर या हॉटेलच्या रस्त्यासाठी डिगेने खडीकरणाचे काम घेतले होते. या कामावरील तसेच जळक्या वाड्यात राहणाऱ्या आपल्या कर्मचाऱ्यांसाठी डिगे या हॉटेलमधूनच जेवण घेऊन जात असल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली.

# विट्याच्या रिंगरोडबाबत तत्काळ कार्यवाही करण्याचे आदेश



**विटा :** येथील रिंग रोड अर्थात बाह्यवळण रस्त्याबाबत तत्काळ कार्यवाही करा, असे आदेश केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी दिल्याची माहिती आमदार सुहास बाबर यांनी दिली. शनिवार दि. १३ डिसेंबर रोजी नागपूर येथे आमदार सुहास बाबर यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली आणि मतदार संघातील विविध विकास कामांबाबत निवेदन दिले. यावेळी विटा या शहरासाठी रिंग रोड करण्याबाबतचे तीन प्रस्ताव शासनाला सादर केले आहेत. याबाबत आमदार बाबर यांनी सांगितले की, आम्ही केंद्रीय मंत्री गडकरी यांना विट्याच्या रिंग रोडबाबत तत्काळ निर्णय घ्या अशी मागणी केली. तसेच गुहागर ते विजापूर राष्ट्रीय महामार्ग (क्र. १६६ ई) मधील रेणावी – रेवणगाव – सुलतानगादे – हिवरे हद्दीतील रस्त्याचे काम लवकर सुरू करा, अहिल्यानगर, बारामती, फलटण, विटा, तासगाव ते म्हैसाळ राष्ट्रीय महामार्ग (क्र. १६०) मधील विटा ते म्हैसाळ या लांबीतील रस्त्याच्या कामास चौपदरीकरणासह मंजुरी देऊन लवकर सुरू करा, तसेच कवठेमहांकाळ ते शेटफळे–आटपाडी– दिघंची– म्हसवड ते फलटण हा नवीन राष्ट्रीय महामार्ग करावा अशी मागणी केली. यावर मंत्री गडकरी यांनी तत्काळ कार्यवाही करण्याचे संबंधितांना आदेश दिले.

# हत्यारे नाचवत दहशत माजवणारी कोयता गँग जेरबंद



**म्हसवड** : पळसावडे व म्हसवड येथील काहींनी सोशल मीडियावर हत्यारांचे व्हिडिओ अपलोड करुन त्यावर 'नायक नही खलनायक हुँ मैं'अशा पद्धतीची प्रक्षोभक गाणी लावून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. याप्रकरणी म्हसवड पोलिसांनी कारवाई करुन सदर कोयता गँगला जेरबंद केले. संशयित दुचाकीवरुन हत्यारे नाचवत दहशत माजवत असल्याने ही कारवाई करण्यात आली. उत्कर्ष भागवत जानकर, सिद्धार्थ किरण रावळ, शंतनु विकास शीलवंत, आर्यन राहुल सरतापे अशी संशयितांची नावे आहेत. संशयित दुचाकीवरुन हत्यारे नाचवत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करत असताना पोलिसांनी कारवाई करुन गँगला ताब्यात घेतले. त्यांच्याकडे तलवारी, कोयते यांसारखी घातक हत्यारे मिळून आली आहेत. संशयितांनी गरुड गँग नावाची गँग स्थापन केली होती आणि या गँगमध्ये त्यांनी अल्पवयीन मुलांना सहभागी करुन घ्यायला सुरुवात केली होती. तसेच त्यांना गुन्हेगारी जगताबद्दल आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जात होता. या कारवाईमुळे गरुड गँगचा बिमोड करण्यात आला आहे.

# साखर कारखान्यांनी १४ दिवसाच्या नियमाचे उल्लंघन केल्याचा आरोप

**सांगली** : शेतकऱ्याच्या शेतातून ऊस तुटून गेल्यानंतर १४ दिवसाच्या आत त्याला बिल देण्याचा नियम आहे. मात्र सांगली जिल्ह्यातील साखर कारखाने सुरू होऊन एक महिना उलटला तरीसुद्धा अद्याप एकाही कारखान्याने उसाचे बिल काढलेले नाही. शेतकऱ्यांना तातडीने बिल द्यावे, अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिला आहे. शुगर केन कंट्रोल ऑर्डर १९६६ च्या कायद्यानुसार ऊस तुटून गेल्यापासून १४ दिवसाच्या आत त्या शेतकऱ्यांच्या खात्यावर साखर कारखान्यांनी बिल जमा करणे गरजेचे होते. परंतु अद्याप एकाही साखर कारखान्याने बिल जमा केलेले नाही. साखर कारखान्यांनी ३५०० चा दिलेला शब्द पाळावा, अन्यथा शेतकरी स्वतःहून कोयताबंद आंदोलन करतील. सध्या सर्वच कारखान्यांनी गाळप क्षमता वाढविली आहे. मात्र तोडणी वाहतूक यंत्रणा प्रत्येक कारखान्याकडे पुरेशी नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनीसुद्धा ऊस घालवायला गडबड करू नये, तसेच ऊसतोडणी, वाहतुकीसाठी पैसे देऊ नयेत. जो कारखाना तीन हजार पाचशे रुपये देणार नसेल तर जो कारखाना ३५०० दर देणार आहे, त्याच कारखान्याला शेतकऱ्यांनी ऊस घालावा. सध्या सांगली जिल्ह्यातून कोल्हापूर जिल्ह्यातील कारखाने भरमसाट ऊस ओढत आहेत. यावरून उसाची पळवापळवी होणार, हे निश्चित झाले आहे. तरीसुद्धा सांगली जिल्ह्यातील साखर कारखानदार अद्यापही शेतकऱ्याच्या खात्यावर त्यांनी जाहीर केल्याप्रमाणे उसाचे पैसे जमा करायला तयार नाहीत, जर साखर कारखानदार मनमानी करणार असतील, तर स्वाभिमानी शेतकरी संघटना स्वस्थ बसणार नसल्याचा इशारा देण्यात आला आहे.

# बालकामगारांचा वाढतोय टक्का;अनेकांचे हिरावतेय बालपण

**सातारा** : शासनाच्या उपाययोजनांमुळे रस्त्यावर, गर्दीच्या ठिकाणी पैसे मागणाऱ्यांची संख्या घटली आहे. मात्र, ऊसतोडणी, वीटभट्टी, हॉटेल तसेच लग्नसमारंभातील केटरर्स अशा हंगामी व्यवसायात बालकामगारांचा टक्का वाढत आहे. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी नदीवर मासेमारी करणारी बालकेदेखील त्यांच्या न्याय हक्कांपासून वंचित राहत असून, त्यांचे बालपण हिरावत आहे. राज्य शासनाच्या वतीने महिला व बाल विकास विभाग, पोलिस प्रशासन, सामाजिक संस्था यांच्यामार्फत बाल कामगार प्रतिबंधासाठी कारवाई होत असली तरी ती तोकडी पडत आहे. शासनाने भिकारीमुक्त शहर अभियान राबवल्यामुळे रस्त्यावर गर्दीच्या ठिकाणी पैसे मागणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे. मात्र, सध्या सुरु असलेल्या ऊस तोडणी, वीटभट्टी, हॉटेल तसेच लग्नसमारंभातील केटरर्स अशा हंगामी व्यवसायात बाल कामगारांची संख्या अधिक आहे. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी नदीवर मासेमारी करणारी बालकेदेखील त्यांच्या न्याय हक्कांपासून वंचित राहत आहेत. ऊसतोडीसह यात्रा-जत्रांमध्ये हंगामी व्यवसाय करणारे व्यावसायिक जिथे काम असेल तिथेच सहकुटुंब राहतात. पालकांच्या फिरत्या वास्तव्यामुळे मुलांची फरफट होत आहे. मासेमारी करणाऱ्या कातकरी समाजाचे नदीकाठीच वास्तव्य राहत असून त्यांची लहानगी देखील मासेमारीचाच वारसा जपत आहेत. बऱ्याचदा पालक मुलांना काम लावत नसले तरी पालकांशिवाय ती राहू शकत नसल्याने त्यांची भटकंती सुरु राहते. यामुळेच ती शिक्षणासह व्यक्तीमत्व विकासाच्या टप्प्यातूनच बाहेर पडत आहे. खेळण्या-बागडण्याच्या वयात दुनियादारीचे शिक्षण मिळत आहे. त्यामुळे या बालकांचे बालपण हिरावत असून अनेकजण शिक्षण प्रवाहातून बाहेर पडत आहेत. त्यामुळे त्यांचे भविष्यदेखील टांगणीला लागत आहे. उपाययोजनांच्या भाऊगर्दीतही बाल कामगारांची समस्या बिकट बनली आहे.


# झिरो बॅलन्स खात्यासही मिळणार मोफत चेक बुक

**मुंबई** : भारतीय रिझर्व्ह बँकेने बेसिक सेव्हिंग्ज बँक डिपॉझिट (बीएसबीडी) प्रणालीत मोठे बदल केले असून, त्यानुसार आता झिरो बॅलन्स खात्यांसाठी चेक बुक, डेबिट कार्डसह अन्य विविध सुविधा मोफत उपलब्ध केल्या जाणार आहेत. बँक खात्यामध्ये किमान शिल्लक, डिजिटल पेमेंटस् आणि बँकिंग चार्जेस अशा बँकांच्या नियमांमुळे ग्राहकांना अडचणी येतात. त्यासाठी आरबीआयने बीएसबीडी प्रणाली सुलभ केली आहे. ग्राहक कोणत्याही बँकेत झिरो बॅलन्सवर खाते उघडू शकतील. किमान शिल्लक (मिनिमम बॅलन्स) ठेवण्याची सक्ती पूर्ण बंद करण्यात आली आहे. बॅलन्स शून्य झाला तरी दंड किंवा खाते बंद होणार नाही. हा नियम सर्व बँकांना आणि सर्व ग्राहकांना लागू असेल, असे आरबीआयने स्पष्ट केले आहे. जुने बचत खाते असो अथवा तुमचे सध्याचे सामान्य बचत खाते तुम्ही ते बीएसबीडीमध्ये ७ दिवसांत मोफत बदलू शकता. जुन्या बीएसबीडी खातेधारकांनाही नव्या सर्व सुविधा लगेच मिळतील. बँकांना त्या देणे बंधनकारक असल्याचे आरबीआयने नमूद केले आहे. खाते उघडताना संबंधिताला स्व- घोषणापत्र द्यावे लागेल. खाते उघडण्यासाठी एक पैसाही लागणार नाही. डेबिट कार्ड किंवा चेकबुक फक्त ग्राहक मागेल तेव्हाच दिले जाणार आहे.

# बॅगा चोरणाऱ्या आंतरराज्य टोळीचा म्होरक्या व त्याच्या मुलाला अटक

**सांगली** : महाराष्ट्रासह इतर राज्यांत बॅगा पळवणाऱ्या आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश करण्यात सांगली स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाला यश आले आहे. याप्रकरणी आंध्र प्रदेशमधील गुड्डेटी टोळीच्या प्रमुखासह दोघांना अटक करण्यात आली आहे. सालमान रामलू गुड्डेटी (वय ५६) आणि त्याचा मुलगा संदीप सालमान गुड्डेटी (३२, दोघे रा. तिप्पा, ता. बिटरगुन्टा, जि. नेल्लोर, आंध्र प्रदेश) अशी त्यांची नावे आहेत. दोघांनी सांगली जिल्ह्यातील शिराळा, कवठेमहांकाळ आणि कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी तालुक्यात बॅग लिफ्टिंगचे गुन्हे केले आहेत. सांगली जिल्ह्यातील शिराळा येथ बुधवार दि. ३ डिसेंबर रोजी माणिक रंगराव पाटील यांनी बँकेतून पेन्शनचे ४३ हजार रुपये काढले होते. त्यानंतर ते रक्कम एका बॅगेत ठेवून बॅग दुचाकीस अडकवून तहसील कार्यालयात स्टॅम्प आणण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांच्यावर पाळत ठेऊन बाप-लेकाने त्यांची बॅग चोरून पलायन केले होते. याबाबत शिराळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. त्यानुसार सहायक निरीक्षक पंकज पवार यांचे पथक तपास करीत आहेत. चौकशीदरम्यान शिराळा येथून बॅग चोरणारा सालमान गुड्डेटी व त्याचा मुलगा संदीप हे दोघे मिरजेतील एका खासगी रुग्णालयाजवळ आल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यानुसार दोघांना सापळा रचून अटक करण्यात आली. त्यांच्याकडे कसून चौकशी केली असता त्यांनी शिराळा येथील चोरीची कबुली दिली. तसेच कवठेमहांकाळ येथेही दुचाकीच्या डिकीतून व कोल्हापूर जिल्ह्यातील बांबवडे येथून बॅग चोरल्याची कबुली दिली. दोघांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून एक लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दरम्यान, सालमान गुड्डेटी हा आंध्रप्रदेशमधील सराईत गुन्हेगार आहे. तो अनेक गुन्ह्यात फरारी होता. त्याच्याकडून सांगली, कोल्हापूर येथील गुन्ह्यांसह गेल्या वर्षी नांदेड, अकोला, लातूर या ठिकाणी झालेल्या ८ गुन्ह्यांची उकल करण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषणला यश आले आहे. सालमान गुड्डेटी याने महाराष्ट्रासह छत्तीसगढ, मध्यप्रदेश आणि आंध्रप्रदेशमध्ये चोऱ्या केल्या आहेत. परंतु तो पोलिसांच्या हाती लागला नव्हता. चारही राज्याचे पोलिस त्याच्या मागावर होते. सध्या शिराळा पोलिसांकडे त्याचा ताबा आहे. लवकरच आंध्रप्रदेशमधील पोलिस सांगलीत येणार असून त्याचा ताबा आंध्रप्रदेश पोलिस घेणार आहेत.

# भ्रष्टाचाराविरोधात लढणाऱ्या नेत्याचा अंत



**तासगाव** : ज्येष्ठ शेतकरी नेते, शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख, चाबूकफोड आंदोलनाचे प्रणेते बाळासाहेब यशवंत कुलकर्णी (वय ७८) यांचे शनिवार दि. २२ नोव्हेंबर रोजी सांगलीत निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुली, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे. बाळासाहेब कुलकर्णी यांनी १९८६ मध्ये शेतकरी संघटनेच्या माध्यमातून लोकसेवेची सुरुवात केली. ग्रामीण भागातील प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी आयुष्य झोकून दिले. १९९० साली धनुष्यबाण चिन्हावर पहिली विधानसभा निवडणूक लढवून त्यांनी राजकीय प्रवासाला प्रारंभ केला. तासगाव येथे श्री गणेश नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना केली. तासगाव तालुका फळे-फुले खरेदी विक्री संघ आणि अन्याय निवारण संस्था स्थापन करून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी व्यासपीठ उभारले. सांगली जिल्हा शिवसेनेच्या जिल्हाप्रमुखपदी दहा वर्षे काम करताना त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि नेतृत्व तासगाव तालुक्यापासून जिल्हाभर प्रभावी बनले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हक्क, साखर कारखानदारीतील भ्रष्टाचार, सिंचनाचा प्रश्न, झोपडपट्टीधारक आणि कष्टकरी यांच्या अडचणी या प्रश्नांत नेहमी ते आघाडीवर राहिले. अडचणीच्या क्षणी कोणत्याही वर्गाच्या माणसाठी धावून जाण्याची त्यांची वृत्ती त्यांना खऱ्या अर्थाने लोकनायक बनवणारी ठरली. १९९२-९३ साली सुरू केलेले चाबूकफोड आंदोलन त्यांच्या संघर्षमय प्रवासातील ऐतिहासिक टप्पा होता. त्यांनी झोनबंदीसह अनेक आंदोलने उभारली. त्यांच्या निधनाने एका लढवय्या, निःस्वार्थी, जननेत्याला जिल्हा मुकला आहे.

# राष्ट्रीय बाजार विधेयक विधानसभेत अखेर मंजूर

**नागपूर** : राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतीमालाला रास्त व वाजवी भाव मिळावा, यासाठी 'ई-नाम' योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि राष्ट्रीय बाजारतळ स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा विधेयक विधानसभेत शुक्रवारी संमत करण्यात आले. या विधेयकावर सत्ताधारी आणि विरोधी सदस्यांनी सविस्तर चर्चा केली. शेतीमालाला योग्य भाव मिळण्यासाठी पणन आणि कृषी विभाग महत्त्वाचा आहे. थेट पणन कायदा ३० वर्षांनंतर गैरलागू आहे, असे वाटू लागले आहेतसे या कायद्याचे होऊ नये, असे मत शिवसेनेच्या शरद सोनवणे यांनी मांडले. लहान बाजार समित्या विशिष्ट मालाच्या खरेदी-विक्रीसाठी ओळखल्या जातात. बाजार संकल्पनेत काय अस्तित्व राहील, याबाबत भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी करवीरचे आमदार चंद्रदीप नरके यांनी केली. खरेदी-विक्रीमध्ये गैरव्यवहार झाल्यास किंवा फसवणूक झाल्यास दाद कुठल्या स्तरावर मागायची आणि त्याचा निकाल किती दिवसात मिळणार, याबबातही स्पष्टता यायला हवी, असे मत त्यांनी व्यक्त केले. भाजप आमदार रणधीर सावरकर आणि समीर कुणावर यांनी राष्ट्रीय बाजार समितीमध्ये चारऐवजी पाच शेतकरी सदस्य अशी दुरुस्ती सुचविली. तथापि, बहुतांश सदस्यांनी या विधेयकावर बोलण्याची मागणी केल्याने पीठासीन अधिकारी किशोर पाटील यांनी गोंधळातच हे विधेयक मतास टाकले. ते सत्ताधारी पक्षाने बहुमताने संमत केले.

# नाईट क्लबला लागलेल्या भीषण आगीत २५ जणांचा मृत्यू



**पणजी :** उत्तर गोव्यातील ‘बर्च बाय रोमिओ लेन’ या किनारपट्टी भागातील प्रसिद्ध नाईट क्लबमध्ये शनिवार दि. ६ डिसेंबर रोजी मध्यरात्री सुरू असलेल्या संगीत नृत्य कार्यक्रमावेळी भीषण आग लागली आणि संगीताची जागा आरडाओरडा आणि करुण किंकाळ्यांनी घेतली. या भीषण आगीत २५ जणांचा मृत्यू झाले तर ५ जण जखमी झाले. मृतांमध्ये ३ महिलांसह ४ पर्यटक क्लबचे १४ कर्मचारी आणि इतर ७ जणांचा समावेश आहे. तिघांचा जळून तर इतरांचा गुदमरून मृत्यू झाला. म्हापशाजवळील हडफडे येथे ही भीषण दुर्घटना घडली. या दुर्घटनेच्या दंडाधिकारीय चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. याप्रकरणी हणजूण पोलिसांनी गुन्हा दाखल करून क्लबचा मालक सौरव लुधरा व गौरव लुधरा यांच्याविरुध्द अटक वॉरंट जारी केले आहे. क्लबच्या चार व्यवस्थापकांना अटक केली आहे. इलेक्ट्रिक पायरो गनमुळे ही आग लागल्याचे स्पष्ट झाले आहे. मृतांच्या नातेवाईकांना पंतप्रधान मदत निधीतून २ लाख, तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे.

याबाबत आधिक माहिती अशी की, नाईट क्लबमध्ये तरुणींचे संगीत नृत्य म्युझिक बँडवर सुरू होते. या कार्यक्रमात सहभागी झालेले सर्वजण नाचगाण्यात गुंग होते. त्याचवेळी तेथे आलेल्या लाईटस्ने (इलेक्ट्रो पायरो गन) पेट घेतला आणि क्षणार्धात आग लागली. या अनपेक्षित घटनेने म्युझिशियन तसेच उपस्थित असलेले सर्वजण सैरावैरा पळू लागले. तोपर्यंत आग भडकली. आगीच्या ज्वाळा आणि धुराचे लोट सर्वत्र पसरले होते. डेक आणि डान्स फ्लोअरवर काय सुरू आहे, याची यत्किंचित कल्पना किचनमधील कर्मचाऱ्यांना नव्हती. तोपर्यंत आगीच्या धुराचे लोट किचनमध्ये पोहोचले. तोपर्यंत उशीर झाला होता. काळ्या कुट्ट धुरामुळे त्यांना बाहेर येण्यासाठी रस्ताच दिसेनासा झाला. त्यामुळे तेथे उपस्थित असलेले बहुतेकजण गुदमरून मृत्युमुखी पडले. तळमजल्यावर तसेच डेक फ्लोअरवर इमर्जन्सी एक्झिट दरवाजा नसल्याने मृतांची संख्या वाढली. दरम्यान, क्लबमध्ये लागलेल्या आगीची माहिती मिळताच पोलिस, अग्निशमन दलाचे बंब आणि जवान घटनास्थळी दाखल झाले. क्लबमध्ये असलेले काही पर्यटक तेथून बाहेर जाण्यात यशस्वी ठरले. त्यामुळे ते बचावले.

सदर क्लबचे बांधकाम बेकायदा आहे. तसेच मालकाकडे क्लबचे कायदेशीर दस्तावेज नाहीत. क्लब अनधिकृत असल्याने तो पाडण्यासाठी नोटीसदेखील देण्यात आली होती. मात्र दिल्लीतील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आशीर्वादामुळेच कोणीही या क्लबविरोधात कारवाई करत नव्हते. या क्लबमध्ये मौजमजा करण्यासाठी दिल्लीतील वरिष्ठ अधिकारी भेट देत असत. या क्लबकडे नियमानुसार आवश्यक असलेली आग प्रतिबंधक उपकरणे तसेच सुरक्षा उपाययोजना नसताना हा क्लब सुरू कसा काय राहतो, असा प्रश्न निर्माण होतो. या क्लबला स्थानिक व दिल्लीतील वरिष्ठ अधिकारी यांचा आशीर्वाद असल्याशिवाय हे शक्य नाही. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करुन दोषीवर कडक कारवाई होणे गरजेचे आहे. क्लबचे मालक सौरव लुधरा व गौरव लुधरा यांच्या विरुध्द अटक वॉरंट जारी करण्यात आले होते परंतू सरकारी यंत्रणेच्या सहकार्याने ते परदेशात पळून जाण्यात यशस्वी झाले आहेत. नुकतीच त्यांना परदेशात अटक करण्यात आली असून लवकरच मायदेशी आणण्यात येणार आहे.




To,

From:
THE WEEKLY VISHAL VITA
Khanapur Road, **VITA - 415311**
Dist: Sangli (Maharashtra)

हे पत्र मालक, संपादक, प्रकाशक श्री. राजेंद्र शहाजी निकम यांनी विशाल ऑफसेट , सांगली येथे छापून मे. साळुंखे इरिगेटर्स, खानापूर रोड, विटा येथून प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (विटा - न्यायक्षेत्र)
RNI No.MAHMAR/1990/04084 Regd.No.DC/MAG/DLR/SR/634/90
वार्षिक वर्गणी रु. १२००/-, स्थानिक रु. १,०००/-
९८ २३४७ २४२५, ८१४९ ९३ २४२५,
८१४९ ९७ २४२५
E-mail : vishalvita@gmail.com, vishalvita@ymail.com
www.facebook.com/vishalvita What'sapp id - 8149 97 2425